सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## घरातच घडली धक्कादायक घटना, पत्नीने केली माजी पोलीस महासंचालकांची हत्या

बंगळुरू : कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक अर्थात माजी डीजीपी ओम प्रकाश यांची राहत्या घरातच हत्या झाली. ही हत्या त्यांच्या पत्नीने केल्याचे प्राथमिक पोलीस तपासातून उघड झाले आहे. सध्या माजी डीजीपी ओम प्रकाश यांची पत्नी आणि मुलगी या दोघी तुरुंगात आहेत. दोघींची पोलीस चौकशी सुरू आहे.

माजी डीजीपी ओम प्रकाश यांची चाकूने वारंवार वार करुन हत्या करण्यात आली. याआधी त्यांचे हातपाय बांधण्यात आले तसेच त्यांच्या डोळ्यांत मिरचीची पूड फेकण्यात आल्याचेही प्राथमिक तपासातून लक्षात आले आहे. मिरचीची पूड डोळ्यांत गेल्यामुळे ओम प्रकाश यांच्या डोळ्यांची आग होऊ लागली, ते एकदम अस्वस्थ झाले. ही संधी साधून ओम प्रकाश यांचे हातपाय बांधण्यात आले. यानंतर चाकूने वारंवार वार करुन माजी डीजीपी ओम प्रकाश यांना गंभीर जखमी करण्यात आले. अती रक्तस्रावामुळे ओम प्रकाश यांचा थोड्या वेळाने मृत्यू झाला. मृत्यू



झाल्यानंतर थोड्या वेळाने खात्री करुन घेण्यात आली. नंतर हातपाय सोडण्यात आले. यानंतर काही तास वेळ वाया घालवून अखेर ओम प्रकाश यांची पत्नी पोलीस ठाण्यात गेली. तिनं पोलिसांना पती मृतावस्थेच आढळल्याचे सांगितले.

माजी पोलीस महासंचालकांच्या शरीरावर चाकूचे वार बघून पोलीस पथक चपापले. त्यांना हत्येचा संशय आला. यामुळे पोलिसांनी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्याचा निर्णय घेतला. तसेच ओम प्रकाश यांच्या घरातील सर्वांची कसून चौकशी करण्याचा निर्णय घेतला. अखेर ओम प्रकाश यांची पत्नी पल्लवी यांनी घडलेल्या गुन्ह्याची कबुली दिली.

मागील काही दिवसांपासून घरात वाद सुरू होता. घटना घडली त्या दिवशीही सकाळी वाद सुरू होता. वाद वाढू लागला आणि ओम प्रकाश यांनी त्यांच्याकडे असलेल्या खासगी शस्त्राचा धाक दाखवण्यास सुरुवात केली. रागाच्या भरात ओम प्रकाश गोळी झाडतील या भीतीपोटी त्यांच्या डोळ्यांवर मिरचीची पूड फेकली. मिरचीची पूड डोळ्यांत गेल्यामुळे ओम प्रकाश अस्वस्थ झाले आणि तिथेच जमिनीवर कोसळले. ते जमिनीवर पडताच त्यांचे हातपाय बांधण्यात आले. यानंतर स्वसंरक्षणासाठी चाकूने ओम प्रकाश यांच्या शरीरावर वार केल्याचे पल्लवी यांनी सांगितले पण स्वसंरक्षणासाठी एक - दोन वार केले जातील. प्रत्यक्षात ओम प्रकाश यांच्या शरीरावर वारंवार चाकूने वार केल्याच्या खूणा आढळल्या. यामुळे पोलिसांनी पल्लवी यांची कसून चौकशी सुरू केली. अखेर पल्लवी यांनी हत्येची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक ओम प्रकाश यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्या पत्नीला अटक केली. तसेच मुलीला ताब्यात घेतले. ओम प्रकाश यांच्या मुलीने नेमके काय केले हे जाणून घेण्यासाठी पोलीस तिची चौकशी करत आहेत.

## पोप फ्रान्सिस ८८ व्या वर्षी ख्रिस्तवासी

व्हॅटिकन सिटी : रोमन कॅथलिक चर्चचे २६६ वे सर्वोच्च धर्मगुरु पोप फ्रान्सिस यांचे सोमवारी ८८ व्या वर्षी निधन झाले. जगातील सर्वात मोठा धर्म असलेल्या ख्रिशन धर्माच्या सर्वात मोठ्या शाखेचे ते सर्वोच्च धार्मिक नेते होते. पोप फ्रान्सिस हे जगभरातील १.४ अब्ज लोकांचे आध्यात्मिक प्रमुख होते. पोप फ्रान्सिस हे २०१३ मध्ये पोप झाले, तेव्हापासून त्यांनी नम्रता, काळजी आणि सुधारणा यावर लक्ष केंद्रीत करून मार्गदर्शन केले. ते रविवारी २० एप्रिल रोजी ईस्टर संडेच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांचीही भेट घेतली होती.

मागील अनेक दिवसांपासून पोप फ्रान्सिस आजारी होते. अखेर सोमवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. याआधी ३ मार्च रोजी त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यामुळे रुग्णालयात दाखल केले होते. काही दिवस उपचार घेतल्यानंतर ते परतले होते. श्वसनाचा विकार झाला असल्यामुळे नियमित पुरेशी विश्रांती घेण्याचा, सात्विक आहार घेण्याचा आणि औषधे



नियमित घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी पोप यांना दिला होता.

पोप फ्रान्सिस ८८ व्या वर्षी ख्रिस्तवासी झाल्याची अधिकृत घोषणा व्हॅटिकन सिटीतील रोमन कॅथलिक चर्चने केली आहे. आता परंपरेनुसार पुढील विधी केले जातील. पोपचे शरीर त्यांच्या खाजगी चॅपलमध्ये हलवले आहे. त्यांच्या देहाला पांढऱ्या रंगाचा कॅसॉक घातला जाईल. जस्त आणि लाकूड यांचा वापर करुन तयार केलेल्या शवपेटीत पोप यांचे पार्थिव ठेवले जाईल. व्हॅटिकनच्या पद्धतींनुसार त्यांचे पायमोजणी आणि पॅलियम आदरपूर्वक बाजूला ठेवले जाईल. नंतर पोप यांच्या देहाला लाल रंगाचा विशेष वेष घातला जाईल. पोपची अधिकृत सही विशिष्ट पद्धतीने तोडली जाईल.

पोप फ्रान्सिस यांचा मृत्यू झाला असल्यामुळे व्हॅटिकन नऊ दिवसांचा शोक जाहीर करेल तर इटली राष्ट्रीय शोक जाहीर करेल. यानंतर पुढील धार्मिक विधी सुरू होतील. पोपचे अंत्यसंस्कार हे मृत्यूनंतर काह दिवसांनी केले जातात. हे सर्व परंपरेनुसार होईल. पोपच्या निधनानंतर साधारण १५ ते २० दिवसांनी कॉलेज ऑफ कार्डिनल्सची बैठक होईल. या बैठकीत नव्या पोपची निवड केली जाईल.

## जम्मू काश्मीरला पावसाचा जबर तडाखा, शाळा बंद, वाहतूक कोलमडल्यामुळे जनजीवन विस्कळीत

श्रीनगर : सलग तीन दिवस जम्मू काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. लडाख या केंद्राशासित भागात अनेक ठिकाणी हिमवृष्टी सुरू आहे. राज्यात काही ठिकाणी गारा पडल्या तर काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वारे, गारपीट, मुसळधार पाऊस, ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, निवडक ठिकाणी झालेली हिमवृष्टी यामुळे सामान्यांचे हाल होते आहेत. फळबागांचे नुकसान झाले आहे. काश्मीरमध्ये बांदीपोरा जिल्ह्यात हिमवृष्टी सुरू आहे. सततच्या हिमवृष्टीमुळे गुरेझ-बांदीपोरा हा वाहतुकीच्यासाठी महत्त्वाचा असलेला रस्ता बंद केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील वाहतूक ठप्प झाली आहे. अनेक रस्त्यांवर पावसाचा तडाखा बसल्यामुळे चिखल झाला आहे. वाहने चालवणे अशक्य झाले आहे. चालत प्रवास करणेही कठीण झाले आहे. सरकारने लोकांना जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरून नाशरी आणि नवयुग बोगद्यादरम्यानचा प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. रामबनमध्ये जमीन खचल्यामुळे महामार्गाचे नुकसान झाले आहे. महामार्ग पुन्हा कार्यरत करण्यासाठी किमान ४८ तास लागतील, असा प्राथमिक अंदाज आहे. प्रशासनाने राज्यात अनेक ठिकाणी शाळा पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

हवामान विभागाने सोमवारी २१ एप्रिल रोजी पुन्हा पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. जम्मू आणि काश्मीरची उन्हाळी राजधानी श्रीनगरमध्ये गेल्या २४ तासांत १६.४ मिमी, बडगाममध्ये १८.० मिमी आणि कुपवाडामध्ये २०.० मिमी पावसाची नोंद झाली. कोकरनाग आणि पहलगाममध्ये अनुक्रमे ३३.२ मिमी आणि २७.८ मिमी पावसाची नोंद झाली.

## बीलाच्या कारणावरून ढाबा मालकाची हत्या
### माजलगावात आठवडाभरात दुसरा खून!

माजलगाव : प्रतिनिधी

जिल्ह्यातील माजलगाव शहर आठवडाभरात झालेल्या दुसर्या खुनामुळे अक्षरशः हादरून गेले आहे. दरम्यान, कायदा सुव्यवस्था धाब्यावर बसल्याने सिद्ध झाला आहे. भाजपा पदाधिकाऱ्याच्या पाठोपाठ धाबा मालकाच्या खुनामुळे माजलगाव शहर आणि परिसरात खळबळ उडाली आहे.

माजलगाव शहरापासून ४ किमी अंतरावर नागडगाव पाटी कॉर्नरवरील गावरान ढाबा मालक महादेव गायकवाड (वय ५४) रा.मंजरथ रोड माजलगाव यांच्या रविवारी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास ढाब्यावर बसलेल्या माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील ग्राहकांनी बिलाच्या कारणाने डोक्यावर वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात ढाबा मालक महादेव गायकवाड व मुलगा आशुतोष महादेव गायकवाड गंभीर जखमी झाले होते. महादेव गायकवाड यांना छत्रपती संभाजीनगर येथे उपचाराठी हलवण्यात होते मात्र उपचारादरम्यान त्यांचे प्राणज्योत मालवली. तर मुलगा आशुतोष महादेव गायकवाड याच्यावर उपचार सुरू असून माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बीडच्या माजलगावमध्ये एका हॉटेलमध्ये बिल देण्याच्या क्षुल्लक कारणावरून ग्राहकांकडून हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या हॉटेल मालक महादेव गायकवाड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. माजलगाव मार्गावर असलेल्या नागडगाव फाटा कॉर्नरवर महादेव गायकवाड यांचा गावरान ढाबा आहे. या ढाब्यावर संध्याकाळी सातच्या सुमारास रोहित शिवाजीराव थावरे आपल्या मित्रांसोबत आला होता. यावेळी रोहितचा हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलासोबत बिलाच्या कारणावरून वाद झाला.

हा वाद इतका विकोपाला गेला की रोहित आणि त्याच्या मित्रांनी महादेव गायकवाड यांच्या डोक्यावर धारधार शस्त्राने वार केले. त्याचसोबत महादेव यांच्या मुलावर देखील प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामध्ये महादेव आणि त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी महादेव यांना बीडमध्ये प्राथमिक उपचार करून छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले. त्याठिकाणी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर त्यांच्या मुलावर उपचार सुरू आहेत.

हॉटेलमध्ये आरोपी आले जेवले आणि त्यानंतर त्यांनी बिलाच्या कारणावरून थेट हॉटेल मालकाला मारहाण केली. मुलाच्या भांडणात पडलेल्या वडिलांनाही आरोपींनी मारहाण केली होती. या धक्कादायक प्रकरणाने बीड जिल्हा हादरला आहे. उपचारादरम्यान मालकाचा मृत्यू झाल्याने गायकवाड कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. पोलीस आरोपींना कधी पकडतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## नागपूरकर उष्णतेत होरपळतायत!

नागपूर : भारतात सगळीकडेच उष्णतेची लाट पसरली असून हवामान विभागाने पुढील काही दिवसांत राजस्थान, मध्य प्रदेश आणि विदर्भातील अनेक भागात अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे. मात्र महाराष्ट्रातील नागपूरमध्ये सर्वाधिक तापमान असल्याचे म्हटले जात आहे.



जानेवारी महिना ओसरला की उष्णतेच्या लाटांना सामोरे जावे लागते. कडाक्याच्या उन्हात अनेकांची प्रकृती देखील खालावते आहे. महाराष्ट्रात सगळीकडेच उन्हाचा प्रहार होत आहे तुलनेने जास्त तापमान नागपूरमध्ये नोंदवल गेल आहे. आजपासून येत्या तीन दिवसात मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आहारात फळांचा समावेश करणे गरजेचे आहे.

## श्रीरामपूर तालुक्यातील कालवा दुरुस्तीच्या कामांना निधी देण्यात येईल- राधाकृष्ण विखे पाटील

शिर्डी, दि.२१ - श्रीरामपूर तालुक्यातील कालव्याच्या दुरुस्तीच्या कामाच्या सूचना विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या असून यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव येथे सुमारे १२ कोटी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ तसेच ग्रामपंचायतीने सुरू केलेल्या लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील वाचनालयाचे उद्धाटन पालकमंत्री श्री.विखे पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच किशोर बनकर, महेश खरात, पुष्पा भोसले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या उपस्थित होते

मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले की, अतिरीक्त पाणी निर्माण करून गोदावरीचे तुटीचे खोरे दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्पाला गती देण्यास शासनाचे प्राधान्य आहे. जिल्ह्यातील भंडारदारा धरणात अतिरिक्त पाणी निर्माण करणे, मुळा धरणातील गाळ काढून उंची वाढवणे या कामाला गती देण्यात येणार असून नदीजोड प्रकल्पाची काम पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. पढेगाव ग्रामपंचायतीने सुरू केलेले वाचनालय हे लोकशिक्षणाचे मंदीर व्हावे अशी अपेक्षा व्यक्त पालकमंत्री म्हणाले, सोशल मिडीयाचा उपयोग वाढत असतांनादेखील वैयक्तिक प्रगतीसाठी वाचनाशिवाय पर्याय नाही. कृत्रिम बुद्धीमत्तेचे मोठे आव्हान आपल्यासमोर येत आहे. नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासोबत वाचनाची सवयही महत्वाची आहे. वाचनालयातून स्पर्धा परीक्षांचे केंद्र सुरू करावे, यासाठी लागणारे संगणक उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही श्री.विखे पाटील यांनी दिली.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्ह्याला तीन पुरस्कार
### तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, मुख्याधिकारी विकास नवले आणि मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांना पुरस्कार

अहिल्यानगर दि.२१- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्ह्याला तीन पुरस्कार प्राप्त झाले असून सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, देवळाली प्रवरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले आणि राहता येथील मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित



होते.

जिल्ह्यात अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या उपक्रमाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. २०२३-२४ च्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२०२४-२५ साठी शासकीय अधिकाऱ्यांमध्ये देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले, तर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये राहाता येथील मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांनाही प्रत्येकी ५० हजार रुपयांचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी कामकाजात संगणकीय प्रणालीच्या उपयोगावर भर दिला. जिल्हा प्रशासनाने गौणखनिज, ई रेकॉर्डस, इक्युजे कोर्ट प्रणाली, ई ऑफीस, 'जलदूत' पाणी टंचाई व्यवस्थापन, भुसंपादन यासारख्या अनेक उपक्रमांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केला.

मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांच्या महसूलविषयक पुस्तकांच्या राज्यातील पहिल्या क्युआर कोड वाचनालयासाठी त्यांना पुरस्कृत करण्यात आले. अधिकाऱ्यांनी लिहिलेली ११ पुस्तके नागरिकांसाठी क्युआर कोडच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले यांच्या मार्गदर्शनाखाली देवळाली प्रवरा नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरालगतच्या ३० गावांसाठी सक्शन मशिनद्वारे मैला उपसा व गाळ व्यवस्थापन यासाठी पंचायत समिती राहुरी व संबधित ३० ग्रामपंचायती यांच्याशी करारनामा केला. यामुळे ग्रामीण व शहरी स्वच्छता सुधारण्यास मदत होणार आहे.

## पोलीस अधिकाऱ्याला जन्मठेप, महिला सहकाऱ्याच्या हत्येप्रकरणी शिक्षा

मुंबई : कोणे एके काळी राष्ट्रपती पुरस्कार विजेता ठरलेला पोलीस अधिकारी आता जन्मठेपेची शिक्षा भोगणार आहे. न्याय सर्वांना समान आहे. कायदा हाती घेतला तर शिक्षा ही होणारच यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. महिला पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे हिची २०१६ मध्ये हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात अश्विनी बिद्रे यांचा लिव्ह इन पार्टनर, अभय कुरंदकर याला न्यायालयाने दोषी ठरवले आणि जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. पोलीस अधिकारी असूनही अश्विनी यांची हत्या झाल्याचे अनेक दिवस समजले नव्हते. अभय कुरंदकर पोलिसांना आणि अश्विनी यांच्या कुटुंबियांना अंधारात ठेवण्यात यशस्वी झाला होता. पण अखेर सत्य उजेडात आलं. यानंतर आता अभय कुरंदकरला हत्येप्रकरणी शिक्षा ठोठावण्यात आली आहे. तर त्याचे सहकारी कुदंन भंडारी आणि महेश फळणीकर यांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. अश्विनीच्या नातलगांना पहिल्यांदा न्याय झाल्यासारखं वाटलं.

महिला पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे ही लिव्ह इन पार्टनर अभय कुरंदकर सोबत एकत्र राहत होती. त्यांच्यात झालेल्या वादाला कंटाळून नराधम अभय कुरंदकरने अश्विनी बिद्रेची हत्या केली. कुऱ्हाडीने तिचे तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवले. त्यानंतर जेव्हा संधी मिळाली तेव्हा त्याने मृतदेहाचे तुकडे भाईंदरच्या खाडीत फेकून दिले. या गुन्ह्याची कबुली अभय कुरंदकरने दिल्यानंतर या कटात सामील असलेल्या त्याच्या साथीदारांनाही बेड्या ठोकण्यात आल्या. अश्विनी यांच्या कुटुंबाचा लढा अखेर आज यशस्वी झाला. पनवेल सत्र न्यायालयाने आजच्या सुनावणीत अभय कुरंदकरला अश्विनीची हत्या करणे, तिच्या शरीराचे तुकडे करणे, आणि पुरावे नष्ट करून खून लपवण्याचा प्रयत्न करणे या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

काय आहे अश्विनी बिद्रे हत्याकांड प्रकरण ?

अभय कुरुंदकर हे मुंबई पोलिसांत अधिकारी होते. त्यांना राष्ट्रपती पदक सुद्धा मिळालं होतं. कुरुंदकर त्यांच्या सोबत काम करणाऱ्या अश्विनी बिद्रेच्या प्रेमात पडले. पण २००५ साली अश्विनी बिद्रेचं लग्न राजू गोरे नावाच्या व्यक्तीशी झालं. लग्नाच्या दोन वर्षांनी तिने महाराष्ट्र पीएससी उत्तीर्ण केली आणि पोलिसात सब-इन्स्पेक्टर झाली. तिचं पहिलं पोस्टिंग पुण्यात झालं. तीन वर्षांनंतर, अश्विनीची सांगलीला बदली झाली.

अश्विनीची हत्या झाली तेव्हा तिची मुलगी अवघ्या ६ वर्षांची होती. अश्विनीची पोस्टिंग रत्नागिरी येथे २०१३ मध्ये झाली. कुरुंदकरचे लग्न झालेले असूनसुद्धा तो अश्विनीसोबत लिव-इन पार्टनर म्हणून राहत होता. दोघांच्याही घरी याची कल्पना होती. अश्विनी २०१४ मध्ये तिच्या पतीपासून वेगळी झाली. मात्र अभयच्या घरी या घडामोडीची माहिती नव्हती.

अभय आणि अश्विनी नवी मुंबईत भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहू लागले. अश्विनीला २०१५ मध्ये बढती मिळाली आणि ती सहाय्यक पोलिस निरीक्षक बनली. बढती झाल्यानंतर ती ११ एप्रिल २०१६ रोजी बेपत्ता झाली. अश्विनीच्या भावाला आनंदला १५ एप्रिल रोजी फोनवर मेसेज आला की ती काही कामासाठी उत्तर प्रदेशला जात आहे आणि एका आठवड्यानंतर परत येईल. मेसेज आल्यामुळे अश्विनीच्या घरचे निवांत होते. मात्र एक दिवस अचानक अश्विनीच्या वडिलांना नवी मुंबई पोलिस मुख्यालयातून मोबाईलवर फोन आला आणि त्यांच्याकडे अश्विनीबद्दल चौकशी करण्यात आली.

अश्विनी दोन महिन्यांपासून कामावर आली नाही, असे त्यांना सांगण्यात आलं. पण कोल्हापुरात राहणाऱ्या अश्विनीच्या कुटुंबाला याबद्दल काहीच माहिती नव्हते. यानंतर अश्विनीचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्यांना अभय आणि अश्विनी यांच्या नात्याबद्दल स्पष्टता मिळाली. त्यानंतर पोलिसांनी अभयची चौकशी केली पण त्यांना काहीच सापडले नाही. काही दिवसांनी तपासादरम्यान पोलिसांना अश्विनीच्या लॅपटॉपमधून काही पुरावे सापडले ज्यावरून दोघांचे प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. पोलिसांना लॅपटॉपमध्ये एक व्हिडिओही सापडला ज्यामध्ये अभय अश्विनीला मारहाण करताना दिसला होता. तब्बल १० महिन्यांच्या तपासानंतर अभयने शरणागती पत्करली आणि अश्विनीचा खून केल्याची कबुली दिली.

अश्विनी आपल्यावर लग्न करण्यासाठी दबाव आणत होती, असे अभयने पोलिसांना सांगितलं. पण आपली इमेज जपण्यासाठी अभय हा त्याची पत्नी आणि मुलांना सोडण्यास तयार नव्हता. याच मुद्यावरून झालेल्या भांडणादरम्यान अभयने अश्विनीचा खून केला. कुऱ्हाडीने तिचे तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवले. त्यानंतर जेव्हा संधी मिळाली तेव्हा त्याने मृतदेहाचे तुकडे भाईंदरच्या खाडीत फेकून दिले असल्याचं कबुल केलं. या घटनेनंतर अश्विनीच्या कुटुंबाने आणि तिच्या मुलीने आईला न्याय मिळावा यासाठी न्यायालयाचे दार ठोठावले. तब्बल ९ वर्षांनी न्यायालयीन लढाईत त्यांना यश मिळालं आहे. अश्विनीच्या मारेकऱ्याला आणि त्याच्या दोन साथीदारांना पनवेल न्यायालयाने दोषी ठरवले आहे.

# डॉ. रोडगे यांच्या कार्याची दखल जागतिक पातळीवर अभिमानास्पद - माजी आमदार बोर्डीकर





**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:-** डॉ. संजय रोडगे यांचे कार्य शिक्षण, समाजसेवा आणि युवक विकास या क्षेत्रांमध्ये अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याची दखल जागतिक पातळीवर घेतली जात आहे,हे अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी रविवार १३ रोजी साई नाट्यगृह येथे आयोजीत सत्कार प्रसंगी केले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, माजी आमदार विजय जाधव, सत्कारमूर्ती तथा श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. संजय रोडगे, डॉ. सविता रोडगे, स्वागताध्यक्ष गोविंद जोशी, डॉ. विनायक कोठेकर, महेश पाटील, डॉ. राम रोडगे, डॉ. अपर्वा रोडगे, बाजार समिती संचालक अनिल पवार,माऊली ताठे, प्रफुल्ल बिनायाके, अशोक पटवारी, रहीम पठाण, सुरेंद्र तोष्णीवाल, नंदु बहिवाल, आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना बोर्डीकर म्हणाले की,आपण शिक्षणाबरोबरच सामाजिक, आरोग्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय आहात. आज आपण अंतरराष्ट्रीय दर्जाचे विज्ञान भवन, जलतरण तलाव, भव्य प्रेक्षागृह व क्रीडांगण सेलू शहरात उभारण्याच्या दिशेने पुढे जात आहात हे सेलूच्या वाट्याला आलेले यश आहे..यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डाँ.प्रताप काळे,माजी आमदार विजय जाधव,महेश पाटील,गोविंद जोशी,डाँ.विनायक कोठेकर आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. संजय रोडगे यांनी शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेपासून केलेल्या कार्याची दाखल घेत लोकमतच्या वतीने हॉगकॉग येथे ''ग्लोबल एक्सलन्स इन एज्युकेशन'' या आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्तीबद्दल त्यांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह शाल, श्रीफळ देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमात एस्रो युविका अहमदाबाद येथे निवड झालेली तनिष्का तेलभरे, नासा अभ्यासक्रमासाठी निवड झालेली तेजश्री चौधरी, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये प्रथम आलेला प्रज्वल रोडगे, होमी भाभा परीक्षेत कांस्यपदक प्राप्त गौरी अबुज आदी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परीक्षांमध्ये यशस्वी ठरलेल्या परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सन्मान करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन, मंथन परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, बीडीएस परीक्षा अशा विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांनाही गौरवण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ऋतुराज साडेगावकर यांनी केले. डॉ. रोडगे यांना दिलेल्या मानपत्राचे शब्दांकन डॉ. शरद ठाकर यांनी तर मानपत्र वाचन माधव गव्हाणे यांनी केले. या भव्य नागरी सत्कार कार्यक्रमात डॉक्टर्स असोसिएशन, मेडिकल असोसिएशन, व्यापारी असोसिएशन, सुवर्णकार असोसिएशन, रामा इंटरनॅशनल स्कूल (वाशिम), वकील संघ, पत्रकार संघ, पालक संघ, डॉ. संजयदादा मित्र मंडळ, रवळगाव फार्म प्रोडूसर कंपनी, तसेच ई-संघटना यांच्यातर्फे सुद्धा डॉ. संजय रोडगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वर्षा गिरी यांनी तर आभार रामराव बोबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संजय रोडगे नागरी सत्कार समितीचे अध्यक्ष डॉ. ऋतुराज साडेगावकर, रामराव बोबडे,रामराव गायकवाड, डॉ. शरद ठाकर, कृष्णा काटे,रामेश्वर शेरे,अमोल निकम, रमेश गोरे, भागवत दळवे, जयसिंग शेळके,अभिजीत राजुरकर, मनोज दीक्षित, अन्वर खान पठाण, निशिकांत पाटील, दत्तराव तांबे पूढाकार घेतला. ''ग्लोबल एक्सलन्स इन एज्युकेशन'' या आंतरराष्ट्रीय पुरस्कार मला मिळाला म्हणजे हा सन्मान माझा नसून तो सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि माझ्यासोबत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे. शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे यावर माझा ठाम विश्वास आहे. हा सन्मान मला पुढे अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा देतो.''

## नूतन विद्यालयाच्या सान्वी, तन्मय यांचे घवघवीत यश

### राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धेत सुर्वण व रौप्य पदकांचे मानकरी

**सेलू,/प्रतिनिधी :** बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने





आयोजित राज्यस्तरीय डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४-२५ मध्ये सेलू येथील नूतन विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत इयत्ता सहावीतील सान्वी गजानन शितळे हीने सुर्वण पदक, तर तन्मय जयकिशन भुतडा याने रौप्यपदक मिळवले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेत विज्ञान विषयातील गोडी निर्माण करणे व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हा उद्देश असतो. इयत्ता सहावी व नववी या दोन स्तरांवर दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या लेखी चाचणी, प्रयोगात्मक चाचणी, प्रकल्प सादरीकरण व मुलाखत या तीनही टप्प्यांत सान्वी व तन्मय या दोघांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. अंतिम फेरीत सान्वीने आपले वैज्ञानिक कौशल्य प्रभावीपणे सादर करत सुर्वण पदक मिळवले, तर तन्मय भुतडा याने उत्तम कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले. या यशामागे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ हे तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. शाळेच्या वतीने तसेच विविध स्तरातून सान्वी आणि तन्मय यांचे अभिनंदन होत आहे.

## जिंतूर येथे भिमजायंती निमित्त ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे यांच्या किर्तनाचे आयोजन

**जिंतूर,/प्रतिनिधी :** विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या



१३४ व्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी जिंतूर शहरात साजरा होणाऱ्या उलगुलान महोत्सव निमित्त राष्ट्रीय कीर्तनकार ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे आळंदीकर यांच्या समाज प्रबोधनपर कीर्तनाचा कार्यक्रम १७ एप्रिल गुरुवार रोजी सायंकाळी सहा वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर प्रांगण, नगर परिषद जिंतूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष ॲड. चंद्रकांत बहिरट कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. देवराव कऱ्हाळे उद्घाटक राहुल शेठ देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जिंतूर तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सामाजिक चळवळीतले प्रमुख व्यक्तिमत्व यांचा सत्कार करण्यात येणार असून जिल्हाभरातून सामाजिक चळवळीतले कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने परभणी जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय कीर्तनकार यांच्या सामाजिक कीर्तनाचा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यामुळे अनेकांना या कार्यक्रमाची उत्सुकता आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक पत्रकार रत्नदीप शेजावळे भगीरथ मिरासे आकाश तारे अशोक प्रधान प्रवीण वाकळे भास्कर सुरवसे शंकर वाघ सुखदेव वाहुळे नामदेव तूपसुंदर यांनी केले आहे.

''भिमजयंती सणाला.. माऊली किर्तनाला''

परभणी जिल्ह्याच्या आंबेडकरी गायन संस्कृतीच्या ईतिहासात भिमजयंती निमित्त प्रतिवर्षी आयोजीत करण्यात येणाऱ्या सांस्कृतीक कार्यक्रमाला भिमगीत, ऑर्केस्ट्रा, गायन सामना अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते परंतु या वर्षी मात्र जिंतूर मधील उलगुलान भिमोत्सव निमित्त वारकरी संप्रदायातील एका किर्तनकाराला आमंत्रित करण्याची बहुदा ही पहिलीच वेळ असल्याने माऊली महाराज वाबळे किर्तनातून नेमका कोणता संदेश देतील याची उत्सुकता वाढली आहे.

## ना.साकोरे यांच्या प्रयत्नातून जिंतूर आगारास पाच बसेस उपलब्ध

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ या



आगारास आज जिंतूर येथे परभणी जिल्ह्याचे कार्यसम्राट व लोकप्रिय पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांच्यामुळे जिंतूर आगारास पाच नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या गेल्या अनेक दिवसापासून जिंतूर आगारास भंगार गाड्या उपलब्ध होत्या या भंगार गाड्यांमुळे अनेक प्रवाशांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत होते त्यामुळे परभणी जिल्ह्याचे लोकप्रिय तथा राज्यमंत्री कार्यसम्राट यांच्यामुळे जिंतूर आगारास पाच नवीन बसेस मिळाल्या. या पाच बसेस आज रोजी जिंतूर आगारास आल्यानंतर त्या बसेसचं प्रवासी व अनेक कार्यकर्त्यांनी स्वागत केले यावेळी जिंतूर चे माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख जिंतूर ते माजी नगराध्यक्ष सचिन भैया उर्फ मुन्ना गोरे तसेच जिंतूर चे माजी नगराध्यक्ष डॉक्टर पंडितराव दराडे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी दादा वटाणे भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थेटे अकोलीचे सरपंच रमेशजी सडाळ आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांचे सहाय्यक सचिव खेतरे आबा माजी नगरसेवक चंद्रकांत बहीरट माजी नगरसेवक विलास भंडारी पत्रकार गुणीरत्न वाकोडे बाबा जोशी आदी मान्यवर व एसटीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते पाच बसेस उपलब्ध झाल्यामुळे कर्मचारी व प्रवासी यांनी आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## सोनपेठ ग्रामीण रुग्णालयात कर्करोग शोध मोहीम

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये बुधवार दि.१६ एप्रिल रोजी कर्करोग निदान करण्यासाठी फिरते कर्करोग शोध वाहन पथक सकाळी दाखल झाले होते. पथकातील डॉक्टरांनी विविध रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात विभागाच्या वतीने परभणी जिल्ह्यामध्ये दि.१ ते ३० एप्रिल दरम्यान कर्करोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सोनपेठ तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये दि.१ ते १५ एप्रिल या पंधरवड्यामध्ये सर्व गावातील आशा स्वयंसेवीका मार्फत स्क्रीन टेस्ट करुन सर्वे करण्यात आला होता. त्यामध्ये आढळलेल्या संशयित रुग्णांची बुधवारी येथील ग्रामीण रुग्णालयात तपासणी करण्यात आली. यावेळी मुख कर्करोगाचे २९ संशयित रुग्ण, स्तन कर्करोगाचे २३ संशयित रुग्ण, गर्भाशय मुख कर्करोगाचे ६ संशयित रुग्ण आढळून आले.त्यामधील गर्भाशयाच्या मुखाच्या संशयित दोन महिलांचे प्रयोगशाळा तपासणीसाठी नमुने घेण्यात आले.

एकुण ५८ कर्करोग संशयितांची तपासणी करण्यात आली. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाचे फिरते वाहन पथक सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले होते. या पथकामध्ये स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.अस्मिता मोरे, दंतरोग तज्ज्ञ डॉ.अमृता नागरे यांनी उपस्थित पुरुष व स्त्रियां मधील गर्भाशय, स्तन व मुखाचे कर्करोग संबंधित तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. यावेळी ५८ रुग्णांनाची तपासणी करण्यात आली. या पथकामध्ये सचिन चव्हाण,फय्युम सय्यद,किशोर नंद,सलिम भाई यांचा सहभाग होता. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विठ्ठल कराड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष पवार हे उपस्थित होते.

## सेलूत डॉ.बाबासाहब आंबेडकर यांना अभिवादन

**सेलू,/प्रतिनिधी-** डाँ.बाबासाहब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त विविध सामाजिक,राजकीय संघटनांच्यावतिने अभिवादन करण्यात आले.नगरपालिका पूतळा परिसर येथे सकाळपासूनच डाँ.बाबासाहब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर,भाजपा शहराध्यक्ष अशोक अंभोरे,माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे,संजय भाग्यवंत,प्रभाकर सूरवसे,प्रा.के.डी.वाघमारे,मनिष कदम,मिलिंद सावंत,मारोती चव्हाण,गौतम धापसे,गौतम साळवे,सूबोध काकडे,विठ्ठल कोकर,दिपक धापसे,राहूल जाधव ,विकास धापसे,रोहन आकात, आदींची उपस्थिती होती .सकाळी ११ वजता समाज बांधवांच्या वतिने सामूहीक बूद्ध वंदना घेत डाँ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मोठ्या प्रमाणावर आंबेडकरी नागरीकांची उपस्थीती होती .



## पूर्णेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी पूर्णा,प्रतिनिधी- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.पांढरे शुभ्र वस्त्र,हातात निळे ध्वज,वाद्यांचा निनाद.. तर जयभीम च्या जयघोषात मग्न झालेली तरुणाई अश्या उत्साहपूर्ण वातावरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने सोमवारी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पारंपारिक वाद्यासह मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीत पंचशील नाट्यगृह व रमाई ग्रुपच्या वतीने लेझीम पथक ,प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले.

मिरवणुकीत अबाल वृद्ध,तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. आंबेडकर नगर येथून सुरुवात होऊन सिद्धार्थ नगर ,अमोल कॉर्नर ,रेल्वे कॉलनी, भीमनगर ,महादेव मंदिर सराफा बाजार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा(शिवतीर्थ ), येथे मिरवणूक दाखल झाली.डॉ.आंबेडकर नगर पासून मिरवणुकीच्या मार्गाने ठीक ठिकाणी रसना,पाणी वाटप करण्यात आले. जयंती मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .तर महात्मा बसवेश्वर चौक येथेही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सायंकाळीं आठ च्या सुमारास मिरवणुकीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोप झाला.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांचे कर्ज प्रलंबीत ठेवणाऱ्या बँकांची यादी सादर करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या कृषी विभागाला सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

जिल्हा कृषी विभागाच्या योजनांमध्ये शेतकऱ्यांची कर्ज प्रकरणे प्रलंबीत ठेवणाऱ्या बँकांची शेतकरीनिहाय यादी तातडीने सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कृषी विभागाच्या आढावा बैठकीत दिल्या आहेत.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात दि २१ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी कृषी विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रा राजेश भालेराव, कृषी केंद्राचे जिल्हाध्यक्ष आनंद निलावार, गणेश मुटकुळे, पवन पातुरकर यांच्यासह विमा कंपनीचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कृषी विभागाच्या कामाचा आढावा घेतला. जिल्ह्यात स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांची कर्ज प्रकरणे मोठ्या संख्येने प्रलंबीत असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. कर्ज प्रकरणे का प्रलंबीत आहेत याची उत्तरे अधिकाऱ्यांना देता आली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची नांवे व बँकेच्या नावांची यादी तातडीने सादर करून बँकेच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलविण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील फार्मर प्रोड्युसर कंपन्या किती आहेत, किती बचत गटांकडून कृषी उत्पादने तयार केली जातात याची माहीतीही सादर करावी तसेच फार्मर कंपन्यांना आपण स्वत: भेट देऊन पाहणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भारतरत्न नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये चांगले काम करण्यास वाव असून त्यानुसार सर्व यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करण्याच्या सूचनाही यावेळी गुप्ता यांनी दिल्या.

जिल्ह्यात आगाती खरीप व रब्बी हंगामात कृषी निविष्ठांचा तुटवडा जाणवणार नाही याची दक्षता कृषी विभागाने घ्यावी. बियाणे, खते मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील याचे नियोजन करावे, कुठेही कृषी निविष्ठा विक्रीमध्ये लिंकींग होता कामा नये प्रत्येक दुकानांसमोर शेतकऱ्यांसाठी टोल फ्री क्रमांक ठळक अक्षरात नमुद करावा तसेच जादा दराने बियाणे व खते विक्री होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी कृषी विभागाला दिल्या आहेत.

# ॲग्रीस्टॅकची कामे कृषी विभागाकडून करवून घ्यावीत

## ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

ॲग्रीस्टॅकची कामे महसूल विभागातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून दबावतंत्राचा वापर करून घेतल्या जात आहेत. प्रत्यक्षात हा शासन निर्णय कृषी विभागाचा असतांना ग्राम महसूल अधिकाऱ्यांना या कामाला लावले जात आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी कृषी विभागाकडे देण्यात यावी, त्यांच्यामार्फत या कामांचा आढावा घेण्यात यावा. ग्राम महसूल अधिकारी केवळ मान्यता व अनुषंगीक कामे करतील यासह इतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना संघटनेच्यावतीने देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. ॲग्रीस्टेकची कामे प्रत्यक्षात कृषी विभागाची असतांना ग्राम महसूल अधिकाऱ्यांना ही कामे देण्यात आली आहेत. सदरील कामे ही कृषी विभागामार्फतच करवून घ्यावीत. औंढा नागनाथ तालुक्यातील ५ ग्राम महसूल अधिकारी यांची पीएम किसान कामासंदर्भात अन्यायकारकरित्या बंद केलेली वेतन वाढ पूर्ववत सुरू करावी. ग्राम महसूल अधिकारी व महसूल सहाय्यक यांची सेवा ज्येष्ठतायादी अंतीम करून तत्काळ पदोन्नत्या देण्यात याव्यात. मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना उच्च दर्जाचे लॅपटॉप व स्कॅनर प्रिंटर उपलब्ध करून द्यावेत. ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचे सन २०१३ पासून सुधारीत शासन निर्णयानुसार कार्यालयीन भाडे अदा करण्यात यावे. ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचे प्रलंबीत वैद्यकीय देयके तत्काळ अदा करण्यात यावेत. ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचे अतिरिक्त पदाचे मानधन देण्यात यावे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी सय्यद अयुब, गजानन रणखांब, विनोद ठाकरे, यु एस पत्की, प्रशांत देशमुख, के एन पोटे, एकनाथ कदम, रंगनाथ महेत्रे, प्रदीप इंगोले, राजकुमार शेळके, केशव अंभोरे आदींची उपस्थिती होती.

# खटकाळी हनुमान मंदिरातील दानपेटी फोडून दोन लाख लंपास

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

शहरालगत असलेल्या खटकाळी हनुमान मंदिरात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दानपेटी फोडून सुमारे २ लाखांपेक्षा अधिक रक्कम पळविल्याची घटना घडली आहे. यावेळी चोरट्यांनी रखवालदारास जीव मारण्याची धमकी दिली तर सीसीटीव्ही कॅमेरे बाजूला करून चोरट्यांनी हा प्रकार केला आहे.

हिंगोली शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळख असलेल्या खटकाळी हनुमान मंदिरात दर्शनासाठी भाविकांची दररोज मोठी गर्दी असते. रविवारी दि २० एप्रिलच्या मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास दोन चोरटे मंदिराच्या परिसरात आले. त्यांनी त्याठिकाणी असलेले रखवालदार बबनराव यांना धमकावले. तू चुपचाप झोपून रहा, उठला तर पिस्टलने उडवून देईन अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या अंगावर पांघरून टाकून दिले. त्यानंतर चोरट्यांनी मंदिराच्या परिसरातच लावलेला ध्वज काढून तोंडाला बांधला व मंदिराच्या बाहेर असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बाजूला वळविले. चोरट्यांनी त्याठिकाणी राहत असलेले भगवानदास महाराज यांच्या खोलीच्या बाहेरून कड्या लावून घेतल्या. त्यानंतर मुख्य चॅनलगेट वाकवून मंदिरात प्रवेश करून त्या ठिकाणी असलेली दानपेटी बाहेरील हॉलमध्ये आणली व त्याठिकाणी पेटी फोडून त्यातील रक्कम पळविली आहे.

सकाळी पाच वाजता जागे झालेले रखवालदार बबनराव यांनी भगवानदास महाराज यांच्या दरवाजाच्या कड्या उघडून त्यांना घडलेली घटना सांगितली. या घटनेची माहीती मिळताच आरती ग्रुपचे सर्व सदस्य घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रार देण्याची कार्यवाही सुरू होती. काही दिवसांपूर्वीच हनुमान जन्मोत्सव व भंडाऱ्याचा कार्यक्रम पार पडला. हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी सुमारे वीस हजार पेक्षा अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यामुळे दानपेटीत सुमारे २ लाखापेक्षा जास्त रक्कम जमा झाल्याचा अंदाज आहे. तसेच मंदिर प्रशासनाने मागील तीन ते चार महिन्यांपासून दानपेटीतील रक्कमही काढली नसल्याचे सांगण्यात आले. चोरट्यांनी अवघ्या वीस मिनीटात दानपेटी फोडून रक्कम घेवून पोबारा केला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.



**हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्या हिंगोली तालुका अध्यक्षपदी माणिक लोडे आणि शहर मंडळ अध्यक्षपदी रजनीश पुरोहीत यांची निवड झाल्यानंतर त्यांना नियुक्तीचे पत्र देतांना माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर व किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर दिसत आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, माजी सभापती उत्तमराव जगताप, सरचिटणीस उमेश नागरे आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात फळांचा राजा आंबा दाखल



हिंगोली– औंढा नागनाथ शहरातील मुख्य बाजारपेठेत फळांचा राजा आंबा दाखल झाला आहे. सध्या बाजारात केशर, दशहरी, बदाम, गावरान आंबा विक्रीस आला आहे.रसाचा केशर आंबा १६० रुपये प्रति किलो, दशहरी आंबा १५० रुपये प्रति किलो, गावरान आंबा ८० ते १०० रुपये प्रति किलो, बदाम आंबा शंभर रुपये प्रति किलो झाले आहेत. शहरात मोठी बाजारपेठ असल्यामुळे नेहमीच बाजारपेठेमध्ये नागरिकांची वर्दळ असते. सध्या रसाळीच्या आंब्याच्या माध्यमातून मोठी उलाढाल होत असल्याने शंभर रुपयामध्ये किलोला रसाचा आंबा विक्रीला आला आहे. आंबे खरेदीसाठी बाजारपेठेमध्ये ग्राहक गर्दी करत आहेत. औंढा शहरातील डॉ. हेडगेवार चौकात रसाचे आंबे मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी विक्रीस आणले आहेत.

### सिध्देश्वर प्रा. आरोग्य केंद्राचे लोकार्पण



हिंगोली– राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत २०१५–१६ या कालावधीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सिद्धेश्वर या इमारतीचे बांधकाम झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा झाला. आ संतोष बांगर यांच्याहस्ते संपन्न झाला. यावेळी महंत आत्मानंद गिरी महाराज, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कैलास शेळके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सतीश रुणवाल, वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास शेळके, डॉ. प्रसाद वाघमारे, डॉ. नामदेव गायकवाड, डॉ. गणेश ताटेवाड, डॉ. रघुनाथ बेंगाळ, डॉ. राम शिंदे, डॉ. गजानन जाधव, डॉ. दामोदर सांगळे यांच्यासह युवा जिल्हाप्रमुख राम कदम, विशाल मस्के, सुधीर राठोड, हरिश्चंद्र गोलाईतकर, नंदकिशोर कोकाटे, संगीता गोबाडे, छाया थिटे, सुभाष जवार,पवन दरगू, विलास चव्हाण, ज्योती बांगर, गीतांजली पाताळे, संध्या नरवाडे, ज्योती राठोड, जिजाबाई शेंबडे, दैवशाला गडदे, सारिका सातव यांच्यासह सिद्धेश्वर व लोहरा केंद्रामधील गटप्रवर्तक व आशावर्कर यावेळी उपस्थित होते.

# लाभ्या मारोती मंदिराचे आ. संतोष बांगर यांचेहस्ते भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

शहरातील मंगळवारा परीसरातील हेमराज गल्लीतील लाभ्या (छोटा )मारोती मंदिराचे भुमीपुजन आ. संतोष बांगर व त्यांचे ज्येष्ठ नागरिक प्रभाकर जोशी यांच्या हस्ते संपन्न झाले. मनातील ईच्छा श्रद्धापुर्वक बोलल्यास लाभ होतो ईच्छा पूर्ण होते म्हणून लाभ्या मारोती असे नाव पडले आहे. जुने मंदिर असून अनेकांच्या मनातील ईच्छा पुर्ण झाल्या आहेत. एक वेगळे समाधान दर्शनाने मिळते, नियमीत पणे दर शनिवारी १२ वर्षांपासून सायंकाळी आरती संपन्न होते. भुमीपुजन सोहळ्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात भक्तांची मान्यवरांची उपस्थिती होती या वेळी माजी नगरसेवक गणेश बांगर, कपिल खंडेलवाल, विशाल गोटरे, अजय पाठक, अभय जोशी, राजेंद्र शुक्ल, प्रतिक जोशी, उमेश डाफणे, प्रभाकर ऋषी, अमीत गेजलवार, डॉ राजेंद्र जोशी,कैलास गुरावा, राजेश लामदाढे, प्रभाकर मेथेकर, अभिषेक कोकडवार, बंडाळे, प्रविण कंदी, राजू सारस्वत, नंदकिशोर जोशी, लक्ष्मीकांत पाठक आदींची उपस्थिती होती.

# एनडीआरएफ, आरपीएफ, नगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिले प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

आपत्ती व्यवस्थापन, रेल्वे पोलिस, नगर पालिकेचे अग्नीशमन दलासह पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांचे रेल्वेच्या डब्यांना आग लागली असता कशाप्रकारे बचाव कार्य करावे याबाबत तळपत्या उन्हात येथील रेल्वे स्थानकांच्या यार्डमध्ये प्रशिक्षण देण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन, रेल्वेविभागातील रेल्वे पोलिस कर्मचारी तसेच नगर पालिकेतील अग्नीशमन दलाचे कर्मचारी यांना दि २१ एप्रिल रोजी येथील रेल्वे स्थानकात प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी तहसीलदार, पोलिस विभागातील अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्यासह पोलिस कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना रेल्वेच्या डब्याला आग लागल्यास कशाप्रकारे बचाव कार्य करायचे याचे प्रशिक्षण भर उन्हात देण्यात आले. दि २२ एप्रिल रोजी या प्रशिक्षणाची रंगीत तालीम होणार आहे.

# समुदाय आरोग्य अधिकारी आरोग्य केंद्रात उपस्थित राहत नसल्याची तक्रार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी पंधरा–पंधरा दिवस उपस्थित नसल्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांची गैरसोय होत आहे. अशा समुदाय अधिकाऱ्यांची चौकशी करावी तसेच दोषींवर कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान कौसर खान पठाण यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात जिल्ह्यात २४ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १२४ उपकेंद्र आहेत. १२१ उपकेंद्रांवर समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु काही समुदाय अधिकारी पंधरा–पंधरा दिवस उपकेंद्रांवर उपस्थित राहत नसल्यामुळे औषधी साठा कालबाह्य होत असून रूग्णांची गैरसोय होत आहे. सदरील समुदाय अधिकारी हे त्यांचा खाजगी दवाखाना चालवित असल्याचेही निदर्शनास येत आहे. या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम तालुका आरोग्य अधिकारी करीत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून ग्रामीण भागातील गोर–गरीब रूग्णांना न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा विराट राष्ट्रीय लोकमंचतर्फे सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

नूतन जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांचे विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्यावतीने शाल व पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिल च्या वतीने हिंगोली जिल्ह्यास नव्याने रुजू झालेले नूतन जिल्हाधिकारी मा.श्री.राहूल गुप्ता (खड)यांचे स्वागत संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल यांच्या हस्ते शाल व पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांना विराट राष्ट्रीय लोकमंचचे शेख नईम यांनी जिल्ह्यातील समस्या व शिक्षणातील भ्रष्टाचार, जल जीवन मिशनातील भ्रष्टाचार, वाळू माफिया, अन्न धान्य माफिया, इत्यादी अनेक समस्या मांडल्या. जिल्हाधिकारी यांनी सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी आश्वासन दिले. यावेळी सोबत शेख नफिस पहेलवान, जिल्हाध्यक्ष शेख बासित, उपाध्यक्ष शेख अवेज, जिल्हा प्रमुख महासचिव शेख शाहनवाज, महासचिव सतीश लोणकर, प्रा.संदीप भुक्तर, शहर अध्यक्ष पठाण साजिद खान, पठाण रउफ खान, युवक अध्यक्ष मो.आमेर बागबान, सय्यद गौस, मो.परवेज, मो. तौहीद, मो.निसार,मो. अफजल, पठाण युसूफ खान गुड्डू, कलीम खान आदींची उपस्थिती होती.

## अग्रलेख...

# होमिओपॅथ नव्हे, देवदूत

काही वेळा पुरस्कारामुळे व्यक्ती मोठी होते, तर काही वेळेला व्यक्तीमुळे पुरस्काराचे महत्त्व वाढत असते. एखादा पुरस्कार मिळाला म्हणून त्या व्यक्तीला, त्याच्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना आनंद होणे स्वाभाविक असते. आपल्याला पुरस्कार मिळावा म्हणून झटणारे, प्रयत्न करणारे पुष्कळ जण असतात, पण काही व्यक्ती अशा असतात समाजासाठी खूप काही करूनही त्या पुरस्काराच्या मागे धावत नसतात, तर पुरस्कारच त्यांच्या मागे धावत असतो. एखाद्या विशिष्ट व्यक्तीला पुरस्कार मिळावा म्हणून समाजातील सर्वजण जेव्हा मनापासून प्रयत्न करतात, तेव्हा त्या पुरस्काराचे मोल वाढत असते. यावर्षी प्रजासत्ताक दिनी पद्म पुरस्कारांची घोषणा झाली आणि मध्य भारतातील प्रसिद्ध होमिओपॅथ, रा. स्व. संघाचे निष्ठावान आणि समर्पित स्वयंसेवक तसेच श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेडचे अध्यक्ष डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा नागपुरातीलच नाही तर मध्य भारतातील प्रत्येकाला आपल्यालाच पद्म पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला. त्या दिवशी नागपुरात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी केली गेली. योग्य व्यक्तीला योग्य पुरस्कार जाहीर झाल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली. खरं म्हणजे डॉ. डांगरे यांना पद्म पुरस्कार याच्याआधीच मिळायला पाहिजे होता, पण यावेळी 'देर आये दुरुस्त आये', असे म्हणायला हरकत नाही. डॉ. डांगरे यांनी नि:स्पृह भावनेने या पुरस्काराचे श्रेय रा. स्व. संघाच्या संस्काराला दिले.

विलास डांगरे तसे होमिओपॅथी डॉक्टर. कधीकाळी होमिओपॅथीच्या डॉक्टरांची, साबुदाण्याच्या गोळ्या देणारे डॉक्टर म्हणून चेष्टा केली जात असे. पण डॉ, डांगरे यांची होमिओपॅथीवर नितांत श्रद्धा आणि विश्वास होता. त्यांनी होमिओपॅथीला लोकमान्यतेसोबत राजमान्यताही मिळवून दिली. होमिओपॅथीचीच नाही तर होमिओपॅथी डॉक्टरांचीही प्रतिष्ठा वाढवली. डॉ. डांगरे यांचे औषध मिळावे म्हणून रुग्णांचे नातेवाईक रात्रीपासूनच त्यांच्या सुरेंद्रनगरच्या दवाखान्यात रांगा लावत होते. त्यांच्या दवाखान्यातील रुग्णांची गर्दी हा होमिओपॅथीच नाही तर ॲलोपॅथीच्या डॉक्टरांसाठी असूयेचा विषय होता, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. डॉ. डांगरे यांच्या दवाखान्यात नंबर लागणे आणि त्यांचे औषध मिळणे हे भाग्याचे लक्षण मानले जात होते. रुग्णांसाठी त्या फक्त साबुदाण्याच्या गोळ्या नव्हत्या, तर अमृतकण होते, असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. डॉ. डांगरे यांच्यावर रुग्णांचा अतूट विश्वास आहे. डॉ. डांगरेच आपल्याला बरे करू शकतील, रोगमुक्त करू शकतील, अशी श्रद्धा हजारो रुग्णांच्या मनात होती आणि अजूनही आहे. ज्या असाध्य अशा आजारावर ॲलोपॅथीचे डॉक्टर हात जोडत अशा आजाराच्या एक दोन नाही तर हजारो रुग्णांना डॉक्टरांनी बरे नाही तर नेहमीसाठी रोगमुक्त केले, त्यांना नवजीवन दिले. ॲलोपॅथी डॉक्टर आता काही करू शकत नाही, हे लक्षात आल्यावर रुग्ण शेवटचा पर्याय म्हणून डॉ. विलास डांगरे यांच्या दवाखान्यात धाव घेत होते आणि डॉक्टरांनीही आपल्यावरील रुग्णांच्या या विश्वासाला कधीच तडा जाऊ दिला नाही. कितीही अत्यवस्थ असला आणि कसाही असला तरी कोणत्याही रुग्णावर उपचार करण्यास त्यांनी नकार दिला नाही. ॲलोपॅथीला मर्यादा आल्यानंतर डॉ. विलास डांगरे यांनी होमिओपॅथी उपचाराचा राजमार्ग प्रशस्त केला. याचा अर्थ आपल्याला ॲलोपॅथी उपचार पद्धतीला कमी लेखायचे नाही. त्या उपचार पद्धतीचीही आज गरज आहे.

विशेष म्हणजे उपचार करताना डॉ. विलास डांगरे यांनी रुग्णाच्या खिशाकडे कधी पाहिले नाही. ज्या रुग्णांची आर्थिक परिस्थिती दयनीय असेल अशा रुग्णांकडून एक पैसाही त्यांनी कधी घेतला नाही. पैसे नाही म्हणून कोणी त्यांच्या दवाखान्यातून रिकाम्या हाताने परत गेला नाही. डॉक्टरांना दैवी आशीर्वाद आहे, असे म्हटले जाते, ते उगीच नाही. डॉ. विलास डांगरे यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९५४ चा अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजारचा. त्या काळात प्रत्येकाची असते, तशीच त्यांच्या घरची परिस्थिती हलाखीची. शिक्षणासाठी म्हणून डॉ. विलास डांगरे नागपूरला आपल्या मोठ्या बहिणीच्या म्हणजे ताराबाई भोयर यांच्या घरी आले आणि नागपूरचेच झाले. विलास डांगरे यांना होमिओपॅथी डॉक्टर करण्याचा त्यांचे बहीणजावई डॉ. प्रभाकरराव भोयर यांचे यासाठी सगळ्यांनी आभारच मानले पाहिजे. १९७४ मध्ये विलास डांगरे यांनी होमिओपॅथीचा डिप्लोमा घेतला, त्यानंतर त्यांना मागे वळून पाहण्याची गरजच पडली नाही. त्यांच्या हाताला दैवी असे यश आहे. रुग्णाची नाडी पाहिली की त्यांना काही सांगण्याची गरज पडत नाही. अशा डॉक्टरांची संख्या आज कमी होत आहे. नि:स्वार्थ वैद्यकीय सेवेची ५१ वर्षे त्यांनी पूर्ण केली आहे, रुग्णसेवेचा हा सुवर्णमहोत्सवच म्हटला पाहिजे. डॉ. विलास डांगरे यांच्याकडून उपचार करून घेणाऱ्या अनेक अति महत्त्वाच्या नेत्यांची यादी पाहिली म्हणजे डोळे दिपून जातात. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, नितीन गडकरी, सुषमा स्वराज, बाळासाहेब ठाकरे, मोहन धारिया, विलासराव देशमुख, गुलाम नबी आझाद, बनवारीलाल पुरोहित, विजय भटकर, मुकुल वासनिक, विलास मुत्तेमवार अशी त्यांच्या अतिमहत्त्वाच्या रुग्णांची किती नावे सांगावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डांगरे यांचे औषध घेतले. डॉक्टर संघाचे स्वयंसेवक असले तरी काँग्रेसचे वा अन्य पक्षांचे कितीतरी नेते त्यांच्याकडून मोठ्या विश्वासाने औषध घेतात. कितीही मोठा आणि श्रीमंत व्यक्ती वा राजकारणी असो की, एखादा सामान्य माणूस डॉक्टर त्याच्याशी तेवढ्याच आपुलकीने आणि जिव्हाळ्याने बोलणार, त्याची ख्यालीखुशाली विचारणार. कोणताही रुग्ण डॉक्टरच्या आपुलकीच्या आणि जिव्हाळ्याच्या बोलण्यानेच अर्धा बरा होत असतो. गंमत म्हणजे नागपुरातीलच नाही तर मध्य भारतातील अनेक ख्यातनाम आणि चांगली प्रॅक्टिस असलेले अनेक ॲलोपॅथी डॉक्टर डॉ. विलास डांगरे यांच्याकडून औषध घेतात, ते उगीच नाही. डॉ. विलास डांगरे यांची रा. स्व. संघानंतर श्रद्धा आहे, रामकृष्ण परमहंस, मां शारदा आणि स्वामी विवेकानंद यांच्यावर. या गोष्टींसाठीच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले आहे. रामकृष्ण मठ हे त्यांचे दुसरे श्रद्धास्थान म्हणायला हरकत नाही. नागपूरच्या रामकृष्ण मठात त्यांचे नियमित जाणे आहे. याठिकाणी स्वामी व्योमरूपानंद यांच्या आग्रहाने विलास डांगरे यांनी स्वामी वीरेश्वरानंद यांच्याकडून दीक्षा घेतली. स्वामी वीरेश्वरानंद यांना मां शारदा यांनी दीक्षा दिली होती. तीन आरसाठी डॉ. विलास डांगरे यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रा. स्व. संघ, रामकृष्ण मठ आणि आपले रुग्ण. यासाठी त्यांनी विवाहही केला नाही. रुग्णांचा परिवार हाच आपला परिवार मानला.

मधल्या एका दुर्दैवी घटनेने डॉक्टरांना आपली दृष्टी गमवावी लागली. पण त्यामुळेही ते निराश झाले नाहीत. बरे झाल्यानंतर त्यांनी पुन्हा रुग्णसेवेला प्रारंभ केला. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या घटनेनंतरही त्यांच्या स्मरणशक्तीत काहीच फरक पडला नाही. आपले दु:ख आणि वेदना विसरत त्यांनी रुग्णांना बरे करण्याचा संकल्प नव्याने सोडला. रुग्णसेवा हीच ईशसेवा यावर त्यांची अढळ अशी निष्ठा आहे. काही माणसं समाजासाठी जगत असतात, यासाठी आपल्या आयुष्याचा होमकुंड करून टाकतात. आज वैद्यकीय व्यवसायाबद्दल फारसे चांगले बोलले जात नाही. वैद्यकीय सेवा ही अतिशय महागडी होत चालली आहे. डॉक्टर होताना जी शपथ घेतली जाते, त्याचा नंतर अनेकांना विसर पडू लागला आहे. याचा अर्थ सगळेच ॲलोपॅथी डॉक्टर खराब आहेत, असे नाही. आजही ॲलोपॅथीत अनेक चांगले, सेवाभावी आणि समर्पित डॉक्टर आहेत, पण त्यांची संख्या कमी आहे. अशा डॉक्टरांची संख्या वाढण्याची गरज आहे. वैद्यकीय क्षेत्रातील या नकारात्मक परिस्थितीत डॉ. विलास डांगरे यांच्यासारखे सेवाभावी डॉक्टर अंधारात मिणमिणत्या दिव्यासारखे काम करत आहेत. अंधार दूर करण्यासाठी एक पणतीच पुरेशी असते. डॉ. विलास डांगरे यांचे काम अशाच पणतीसारखे आश्वासक आणि दिलासादायक आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# राष्ट्रपतींना 'व्हेटो' नाही!

ग्यानी झैलसिंग राष्ट्रपती असतानाची ही घटना. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्याशी त्यांचे शीतयुद्ध सुरू होते. त्या शीतयुद्धाचा एक भाग म्हणून ग्यानीजींनी संसदेने पारित केलेल्या पोस्टल विधेयकाला आपली मंजुरी रोखून ठेवली होती. राष्ट्रपतींनी विधेयकाला मंजुरी द्यावी म्हणून राजीव गांधी आपल्या काही मंत्र्यांना राष्ट्रपतींकडे पाठवीत होते. पण, ग्यानीजी त्यास तयार नव्हते.

**ताजा निवाडा** : सर्वोच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ती न्या. पारडीवाला व न्या. महादेवन् यांनी तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल या प्रकरणात दिलेल्या निवाड्यानंतर राष्ट्रपतींना हे करता येणार नाही. राष्ट्रपती व राज्यपाल यांना एखाद्या विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आजवर अशी कोणतीही कालमर्यादा नसल्याने राष्ट्रपती वा राज्यपाल यांना वादग्रस्त विधेयक एकदम न फेटाळता ते थंड्याबस्त्यात ठेवण्याची सोय होती. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निवाड्याने ही सोय काढून घेण्यात आली आहे. या निवाड्याचे सर्वसाधारणपणे स्वागत करण्यात आले असले तरी त्यातील एका उणिवेवर बोट ठेवण्यात आले आहे.

**राष्ट्रपतींची बाजू** : सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेले प्रकरण राज्य सरकार विरुद्ध राज्यपाल असे होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आपला निवाडा यापुरताच मर्यादित ठेवला असता तर बरे झाले असते असे मानले जाते. सर्वोच्च न्यायालयाने सारासार विचार करून राष्ट्रपतींसाठीही एक कालमर्यादा घालून दिली आहे. पण असे करताना न्यायालयाने राष्ट्रपतींची बाजू ऐकून घेतली नाही ही या निवाड्यातील एक वादग्रस्त बाब ठरली आहे. अटर्नी जनरल आर. वेंकटरमाणी यांनी म्हटले आहे, या साऱ्या वादात राष्ट्रपतींची बाजू ऐकून घेणे आवश्यक होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली नाही. या साऱ्या प्रकरणात राष्ट्रपती कुठेच नव्हते. अटर्नी जनरलांची ही खंत योग्य अशीच आहे. केंद्र सरकार याबाबत सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करणार काय, या प्रश्नांवर अटर्नी जनरलांचे उत्तर होते, याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

**वेणुगोपाल यांची प्रतिक्रिया** : माजी अटर्नी जनरल व नामवंत कायदेपंडित के. के. वेणुगोपाल यांनी मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशावर समाधान व्यक्त केले आहे. राज्यपाल व राष्ट्रपती यांना एकाच पारड्यात ठेवून सर्वोच्च न्यायालयाने योग्य तेच केले आहे, असे वेणुगोपाल यांनी म्हटले आहे.

**कलम २०० व २०१** : राज्यघटनेच्या कलम २०० व २०१ मध्ये याबाबत तरतूद करण्यात आली आहे. कलम २०० मध्ये राज्यपालांच्या कृतीची चर्चा करण्यात आली आहे तर कलम २०१ मध्ये राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राखून वा रोखून ठेवलेल्या विधेयकांची चर्चा करण्यात आली आहे. सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कलम २०१ हे राज्यपालांनी कलम २०० अंतर्गत घेतलेल्या निर्णयाच्या परिणामांबाबत आहे.

**वादाचा प्रारंभ** : विविध राज्यांच्या विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांना त्या त्या राज्याच्या राज्यपालांनी मंजुरी न देता ते थंड्याबस्त्यात ठेवण्याच्या घटना मागील काही वर्षांपासून घडत आहेत. प्रथम हे पंजाबमध्ये झाले, केरळमध्ये झाले आणि तामिळनाडूतही झाले. तामिळनाडू विधानसभेने काही विधयके पारित केल्यानंतर ती मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आली. राज्यपालांनी त्या विधेयकांना मंजुरी न देता ती फेरविचारासाठी राज्य विधानसभेकडे पाठविली. राज्य विधानसभेने ती पुन्हा मंजूर करीत, मंजुरीसाठी पुन्हा राज्यापालांकडे पाठविली. घटनेनुसार राज्यपालांनी या विधेयकांना स्वीकृती देणे अपेक्षित होते. त्यांनी ती न देता राष्ट्रपतींकडे पाठविली. एकूण १० विधेयकांपैकी राष्ट्रपतींनी तीन विधेयकांना मंजुरी दिली आणि सात विधेयके थंड्याबस्त्यात टाकली. त्यांनीही त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. या विरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने ९० दिवसांच्या आत अशा विधेयकांवर निर्णय घेण्यात यावा अशी कालमर्यादा राज्यपाल व राष्ट्रपती दोघांसाठीही निर्धारित केली.

**निर्णय म्हणजे मंजुरी नव्हे** : सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती व राज्यपाल यांना विधेयकाला मंजुरी देण्यासाठी ९० दिवसांची कालमर्यादा घालून दिली असली तरी, याचा अर्थ ९० दिवसांच्या आत त्या विधेयकाला मंजुरी देणे असा मात्र नाही. राष्ट्रपतींना विधेयकाबाबत काही स्पष्टीकरण हवे असल्यास ते त्यांनी संबंधित राज्यांकडून मागवावे आणि राज्यांनी याबाबत राष्ट्रपतींना पूर्ण सहकार्य करावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय योग्य असाच आहे. मात्र, तो घेण्यापूर्वी राष्ट्रपतींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली असती तर ते योग्य झाले आहे. कारण, न्यायाचे एक प्रमुख तत्त्व म्हणजे सर्व पक्षांना ऐकून घेणे. यात राष्ट्रपती एक 'पक्ष' आहे. त्यांचीही एखादी भूमिका असावी. सर्वोच्च न्यायालयाने ती ऐकून घेतली असती तर ती बाजूही देशासमोर आली असती.

**तर आमचा सल्ला मागावा** : राज्य सरकारने पारित केलेल्या विधेयकांबाबत निर्णय घेताना राष्ट्रपतींच्या मनात काही शंका- कुशंका असतील तर राष्ट्रपतींनी कलम १४३ अंतर्गत त्यांना असेलल्या अधिकारांचा वापर करीत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागावा असेही या निवाड्यात नमूद करण्यात आले आहे. मात्र यासाठी आम्ही राष्ट्रपतींना सक्ती करू शकत नाही. राष्ट्रपतींनी सल्ला मागितल्यास तो एक चांगला निर्णय असेल असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. यासाठी न्यायालयाने काही देशांतील घटनात्मक तरतुदींचा हवाला दिला आहे.

**राष्ट्रपतींना व्हेटो नाही!** : एखाद्या विधेयकाची मंजुरी रोखून ठेवण्याबाबत राज्यपालांना व्हेटो म्हणजे नकाराधिकार नाही. हीच बाब राष्ट्रपतींना लागू होते असे परखड भाष्य सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यात केले आहे.

**संदर्भ पाकिस्तानचा** : ४१५ पृष्ठांच्या या ऐतिहासिक आदेशात सर्वोच्च न्यायालयाने अमेरिका व पाकिस्तान यांच्या राज्यघटनांमध्ये असेलल्या तरतुदीचांही संदर्भ दिला आहे.

**'मूळ चौकटीचे' मूळ** : ५२ वर्षे व तीन दिवसांपूर्वी २४ एप्रिल १९७३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार खटल्यात एक निवाडा दिला होता. ७ विरुद्ध ६ अशा अटीतटीच्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार तर आहे पण, घटनेच्या मूळ चौकटीला धक्का लावणारी घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार नाही असे म्हटले होते. राज्यघटनेची मूळ चौकट म्हणजे काय हेही न्यायालयाने आपल्या निवाड्यात परिभाषित केले आहे. पण, हा 'मूळ चौकट' शब्द आला कुठून?

पाकिस्तान सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशाने आपल्या एका निवाड्यात या शब्दाचा वापर केला. नंतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्याचा वापर केला. ज्येष्ठ विधिज्ञ फॉली नरिमन यांच्या एका पुस्तकात हा रंजक किस्सा सांगण्यात आला आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ताज्या निवाड्यात पुन्हा एकदा पाकिस्तान राज्यघटनेचा संदर्भ दिला आहे हे विशेष.

**उपराष्ट्रपतींचे अण्वस्त्र!** : सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्यावर, विशेषत: राष्ट्रपतींसाठी त्यांनी घालून दिलेल्या कालमर्यादेबाबत सरकारी गोटातून टीका केली जाईल हे अपेक्षित होते. तसे झालेही. उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी या विधेयकावर टीकास्त्र नव्हे तर अण्वस्त्र सोडले आहे. येणाऱ्या काळात या अण्वस्त्राचे साद-पदसाद उमटत राहणार आहेत.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी?.

साडेचार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वारंवार पुढे ढकलल्या जात आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा नेहमी उपस्थित केला जात असून, न्यायालयात या विषयाच्या अनेक याचिका दाखल आहेत. ठोस कारणांशिवाय निवडणुका रोखून धरता येत नसल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. परंतु, अद्याप या विषयावर तोडगा निघालेला नाही. राज्य निवडणूक आयोगाने अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत जाहीर केली. अनेक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणही जाहीर केले. परंतु, निवडणुका मात्र होऊ शकल्या नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महाराष्ट्रात २७ हजार ९५१ ग्रामपंचायती आहेत. यातील बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट आहे. अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत काढून सहा महिने लोटले. परंतु, निवडणुका जाहीर होत नसल्याने नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये कमालीची नाराजी आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून मुदतीत निवडणुका घेण्याची सूचना निवडणूक आयोगाला करण्यात आली. राज्य सरकारही निवडणुका घेण्यासाठी इच्छुक आहेत. मग, घोडे अडले तरी कुठे, असा प्रश्न पडतो. ग्रामपंचायती आणि सरपंचांना कायद्याने विशेषाधिकार दिले आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी हजारावर योजना आहेत. परंतु, या योजना राबविणारे सरपंच आणि ग्रामसभाच अस्तित्वात नसल्याने बहुतांश विकासकामे ठप्प आहेत. जानेवारी २०२६ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु, न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा पेच सुटलेला नाही आणि अशातच नवनवीन याचिका दाखल केल्या जात आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणूक पार पडली. यानंतर तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी अपेक्षा होती. या निवडणुकांच्या मार्गातील ओबीसी आरक्षण केवळ एवढाच अडसर नाही तर अन्य अनेक मुद्यांबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल आहेत. या सर्व प्रश्नांवर न्यायालयाने एकत्रित सुनावणी घ्यावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. केवळ ग्रामपंचायतींच्याच नाही, तर मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २५७ नगरपालिका आणि २८९ नगर पंचायतींच्या निवडणुका बाकी आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील ढीगभर याचिकांचा निपटारा केला तरीही निवडणूक कार्यक्रम काही घोषित होऊ शकला नाही!

जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक असल्याने अधिकाऱ्यांवर कोणाचाच वचक राहिलेला नाही. नको तिथे पैसा खर्ची होत आहे आणि गरजेच्या ठिकाणी हात आखडता घेतला जात आहे. हा सर्व सावळागोंधळ रोखण्यासाठी निवडणुका हाच एकमेव मार्ग आहे आणि नेमका हाच मार्ग विविध कारणांनी अवरुद्ध करून ठेवलेला आहे. निवडणुकांसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी वारंवार पुढे ढकलली जात आहे. आता जनता या प्रकाराला त्रासली असून होईल त्या स्थितीत निवडणुका घ्या, अशी मागणी होऊ लागली आहे. २५ फेब्रुवारी २०२५ च्या सुनावणीतही फार काही निष्पन्न झालेले नाही. स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांची विविध कामांसाठी परवड होत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचाच कारभार सध्या अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली आहे. निवडणुका होत नसल्याने काहींनी यासाठीही न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. परिणामी, न्यायालयाचाही वेळ खर्ची पडत आहे. लोकप्रतिनिधींअभावी रस्त्यावरील खड्डे, गटारी-नाल्यांची सफाई, पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती एवढेच काय, नागरिकांच्या प्रमाणपत्रांचीही कामे खोळंबली आहेत. लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा वचक असतो. कारण, त्यांना पुन्हा निवडून यायचे असते. परंतु, अधिकाऱ्यांना ही भीती नसते. काही ठिकाणी प्रत्यक्ष आमदारांनाच ही स्थानिक कामे करावी लागत आहे. मार्च २०२१ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता येणार नाही, या सबबीवर सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आणि तेव्हापासून महाराष्ट्राच्या वाट्याला ही डोकेदुखी आली. तत्कालीन सरकारने आपली बाजू योग्यरीत्या मांडली असती तर आज हा पेच निर्माण झाला नसता. परंतु, आता पश्चात्ताप करण्याशिवाय उपाय नाही.

देवेंद्र फडणवीस यांचा नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री असा प्रवास राहिलेला आहे. त्यामुळे त्यांना या समस्येची चांगलीच जाण आहे. त्यामुळेच नागरिकांसह राजकीय कार्यकर्त्यांना त्यांच्याकडून मोठी अपेक्षा आहे. सरकार निवडणुका घेण्याबाबत आग्रहीसुद्धा आहे. परंतु, न्यायालयीन कामकाजात सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. परिणामी, हा मुद्दा खूपच गुंतागुंतीचा होऊन बसला आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा


अमोल पुसदकर

# सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता

सर्वोच्च न्यायालयाने एका नाजूक विषयावर परखड मत व्यक्त केलेले आहे. यामध्ये न्यायमूर्ती म्हणतात की, आज काळ बदलत चाललेला आहे. मुला-मुलींचे कॉलेज जीवनातील संबंध हे लग्नापर्यंत पोहोचतीलच असे नाही. तर त्यांच्यामध्ये ब्रेकअप झाले असता मुलावर दाखल होणारा बलात्काराचा गुन्हा योग्य नाही. असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. यामध्ये न्यायमूर्ती स्पष्ट करतात की, आमच्याही घरी मुली आहेत. परंतु तरीसुद्धा न्याय म्हणून बघताना अशा संबंधांना समजून घेणे आवश्यक आहे.

सातत्याने वर्तमानपत्रात छापून येणारी बातमी म्हणजे लग्नाचे आमिष दाखवून प्रस्थापित केलेल्या संबंधांमुळे युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला. कधी कधी मुलीचे वय साडेसतरा वर्षे असल्यामुळे ती अल्पवयीन आहे असेही म्हटले जाते. तसे पाहिले तर साडेसतरा आणि अठरा याच्यामध्ये फारसा फरक नाही. तरीही सातत्याने कुठलेही संबंध लग्नापर्यंत जर पोहोचले नाही तर मुलांवर हमखास अशा पद्धतीचे आरोप होतात व त्यांच्यावर गुन्हे सुद्धा दाखल होतात. अशा गुन्ह्यांमध्ये त्यांच्या जीवनातील अनेक वर्षे निघून गेल्यावर जर माननीय सर्वोच्च न्यायालयासारखे न्यायालय त्याच्यावरचे गुन्हे रद्द करण्याचा आदेश देतही असेल तरीसुद्धा विलंबाने न्याय मिळणे म्हणजे न्याय नाकारणेच होय. आता तीस वर्षांच्या एका आयपीएस झालेल्या आणि २८ वर्षांच्या एका डॉक्टर तरुणीचे एक प्रकरण नुकतेच चर्चेत आलेले आहे. यामध्ये सुद्धा आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून संबंध ठेवले अशा पद्धतीचा आरोप ठेवून त्याच्यावर गुन्हा दाखल केला गेला आहे. हे लोक अनेक वेळा भेटले आणि लग्नाआधी केरळला फिरायला सुद्धा गेले. दोघेही सज्ञान आहेत. वय सुद्धा काही बालिश नाही. दोघेही उच्चशिक्षित आहेत.

आणखी एका प्रकरणांमध्ये एक विधवा स्त्री जी ४५ वर्षांच्या वर आहे व आरोपी पन्नास वर्षांचा पोलिस अधिकारी आहे यांचेही अशाच प्रकारचे 'आमिष'प्रकरण समोर आले होते. संबंधविच्छेद म्हणजे ब्रेकअप नंतर मुलगी साडेसतरा वर्षांची असो की पंचेचाळीस वर्षांची, बारावी पास असो की एमबीबीएस डॉक्टर, आरोप मात्र लग्नाचे आमिष दाखविणे हेच असतात. डॉक्टर झालेल्या मुलीने आमिषाला बळी पडण्याचे कारणच काय? तिला चांगला डॉक्टर मुलगा मिळाला नसता का?



माझ्या 'नाही'चा अर्थ नाहीच होतो हे सूत्र का पाळले जात नाही. या सर्व प्रकरणातील गंभीरता लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने आपली चिंता व्यक्त केली असेल असे वाटते. पूर्वी एक काळ असा होता की मुली फारशा शिकत नव्हत्या किंवा त्यांना नोकरी राहत नव्हती अशा वेळेस नोकरी करणारा मुलगा ही एक मोठी गोष्ट समजली जात होती. परंतु आता समाज बदललेला आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये कोणीही भेदभाव करत नाही. त्यामुळे दोघांनाही शिक्षणाच्या समान संधी प्रदान केल्या जातात. अनेक समाजामध्ये तर लग्नासाठी मुलीच मिळत नाही अशा परिस्थितीमध्ये मुलगा मुलीला लग्नाचे आमिष कसे दाखवू शकतो? कारण ५० हजार रुपये सुद्धा पगार असलेल्या मुलांना आज मुली मिळत नाही ही एक वास्तविकता आहे. त्यामुळे लग्नाचे आमिष मुलींनी मुलांना दाखविण्याची वेळ आलेली आहे. अशा प्रकारच्या संबंधांमध्ये टाळी एका हाताने वाजत नाही याचे ही स्मरण ठेवणे आवश्यक आहे. ज्या समस्या शिक्षकांना दहाव्या वर्गात बघायला मिळत होत्या, त्या त्यांना आता सहावी, सातवीमध्ये बघायला मिळत आहे. जी मद्यसंस्कृती पूर्वी मुंबई, पुण्यापुरती मर्यादित होती, ती आता तीन-चार लाखांच्या शहरांपर्यंत सुद्धा पोहोचलेली आहे. पानठेल्यावर सिगारेट पिणाऱ्या मुलांसोबतच मुलीही आपल्याला दिसू शकतात.

मुलांना मैत्रीण आणि मुलीला मित्र जर असतील तर आई-वडील सुद्धा त्यांच्याकडे शंकाग्रस्त दृष्टीने लक्ष ठेवायचे. हळूहळू याला मागासलेपणा समजला जाऊ लागला. यामध्ये मुलींचे वडील जास्तच मागास आणि कालबाह्य वृत्तीचे आहेत असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात येऊ लागला. फॅशनच्या नावाखाली जी पोशाख संस्कृती सर्वत्र दिसू लागली तिच्यावर जर कोणी बोट ठेवले तर त्याला सर्वांत प्रथम विरोध घरातूनच व्हायचा आणि तो म्हणजे मुलीच्या आईचा. तुम्हाला काही समजत नाही. आजकाल जग कुठे गेलेले आहे हे तुम्हाला माहीत आहे का? हाऊस मौज आता नाही करायची तर केव्हा करायची. समाज प्रबोधन करणाऱ्या एखाद्या वक्त्याने या विषयावर जर आपले काही मत मांडले तर पुरोगामी असलेल्या अनेक विदुषी त्यांच्यावर आक्रमकपणे तुटून पडायला तयार असायच्या आणि असा विषय मांडणाऱ्यांची मानसिकता किती रोगग्रस्त आहे, त्यांच्या डोक्यातच किती खराबी आहे अशा पद्धतीचे विषय मांडले जायचे. त्यामुळे घरातल्या वडिलांचा विरोध मोडून काढला गेला. समाजातले या विषयावर बोलणारे, लिहिणारे काही लोक असतील तर तेही थंड झाले. त्यामुळे या विषयाला विरोध करणारा ना घरात उरला ना महाविद्यालयात उरला. त्यामुळे महाविद्यालयातील स्नेहसंमेलने आणि विविध कार्यक्रम हे अनेक लोकांसाठी पर्वणी ठरू लागले. व्हॅलेंटाईन डे, रोज डे, फ्रेंडशिप डे सारखे उत्सव हे समाज उत्सव झाले आणि यातूनच मैत्रीच्या नव्या व्याख्या जन्माला आल्या. मर्यादा कोणी ओलांडली हे बघणे गौण झाले. फक्त काही ब्रेकअप हे आवाज न होता तर काही आवाज करून होतात. काहींमध्ये गुन्हे दाखल होतात.

सगळेच मुलं किंवा मुली असे अजिबातच नाही. कोणाच्या जीवनामध्ये एखादा असा प्रसंग घडल्यास त्यांचे संपूर्ण जीवनच तसे जाणार आहे असाही याचा अर्थ नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या मताचा व चिंतेचा आपणही आदर व सन्मान केला पाहिजे. अशा पद्धतीचे सर्व धोके ओळखून आपण आपल्या घरातील पाल्यांना कशा पद्धतीने सजग, जागृत करू शकू याचा पालकांनीही विचार केला पाहिजे. अशा पद्धतीच्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना सुद्धा आपल्या संवादामध्ये कशा पद्धतीचा बदल करावा लागेल याचाही विचार शिक्षकांनी करणे गरजेचे आहे. भविष्यकाळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन ही सुद्धा काळाची एक गरज होऊन बसणार आहे. वृत्तपत्रांमध्ये छापून येणारे असे सर्व आमिषाचे प्रसंग शाळा, महाविद्यालये अशा सर्व ठिकाणी सांगितले गेले पाहिजे. जेणेकरून पुढच्याच ठेच मागचा शहाणा अशा पद्धतीने काहीतरी सुधार होऊ शकेल. ठेच खाऊन शहाणे होण्यापेक्षा इतरांना लागलेल्या ठेचा बघून आपण आपोआपच शहाणे होणे आवश्यक आहे. सुप्रीम कोर्टाच्या चिंतेवर आपण उपाय शोधू शकल्यास उत्तमच आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## संघटन म्हणजेच शक्ती

आम्ही बालपणी संघ शाखेत खेळ खेळायचो . त्याच नाव 'संघटन में शक्ती हैं.' खरंच आहे संघटन एक महाशक्ती आहे. त्याचा संघटक उत्तम असला पाहिजे. त्याचं एक छान उदाहरण म्हणजे ब्रिटनचा व्हाईसराय लॉर्ड माऊंबॅटनने म्हटलं होतं की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखा उत्तम संघटक आमच्या इंग्लंडमध्ये जन्माला असता तर त्याने संपूर्ण ब्रह्मांडावर राज्य केले असते. उत्तम संघटक असेल तर उत्तम संघटना निर्माण होते. आताच मागील दोन महिन्यापूर्वी नरेंद्रनगर मैदानावर 'मुख्यमंत्री चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा' पार पडली. तीन ते चार दिवस ही स्पर्धा चालली. कुठल्याही संघाचे भांडण नाही, कुठल्याही परीक्षकांची अरेरावी नाही आणि कुठल्याच प्रकारचा गोंधळ नाही. अगदी मस्त नरेंद्रनगरवसी व संपूर्ण नागपूरकरांनी भरपूर आनंद घेतला. विशेष म्हणजे आजच्या मोबाईलच्या युगात लहान मुलेसुद्धा या स्पर्धेचा आनंद घेत होते.

संस्था मजबूत असेल तर कोणतेही सामाजिक कार्य अगदी सहजपणे पार पडू शकते हे या लक्षवेध संस्थेकडून शिकण्यासारखे आहे. १९९० मध्ये पहिले नरेंद्रनगर क्रीडा मंडळ म्हणन ही संस्था उदयास आली. नंतर हळहळ त्याचा वटवृक्ष होत २००४ मध्ये तिचे रूपांतर लक्षवेध बहुउद्देशीय संस्था म्हणून नावारूपास आली. कबड्डी सामन्यासाठी एकाच वेळेस सुमारे ५ ते ६ हजार प्रेक्षक बघू शकतील असे सुंदर प्रकाशझोतातील मिनी स्टेडियम तयार केले होते. पिण्याच्या पाण्याची सोय, गाड्या पार्किंग व्यवस्था अगदी चोख. आलेल्या सर्व संघाची नाश्ता, भोजन, निवासाची पूर्ण व्यवस्था संस्थेने केली होती. उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले, तर बक्षीस वितरण नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. सांगायचं तात्पर्य हे की, जर संघटन मजबूत असेल तर कोणतेही कठीण कार्य ते उत्तमरीत्या पार पाडू शकता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नरेंद्रनगर लक्षवेध बहुउद्देशीय संस्था हे होय.

**भूषण पांढरीपांडे**/७०५७०६४७६७

●● ●●

## कशासाठी? पोटासाठी!

कोरोनाचे उच्चाटन झाल्यानंतर आजकल बांधकाम क्षेत्रात जबरदस्त मागणी वाढली आहे. प्रत्येक जण घर खरेदी करण्यात अग्रेसर आहे. घराची मागणी वाढल्यामळे कशल मनष्यबळाची

## वाचक पत्रे

गरज वाढली आहे. ती पूर्ण करण्याकरिता बाहेरील राज्यातील मजूर रोजंदारीवर आपल्या महाराष्ट्रात येत आहेत. त्यामुळेच घराचे बांधकाम वेळेत पूर्ण होत आहे. पण ते मजूर किती धोकादायक स्थितीत काम करतात हे प्रत्यक्ष पाहिल्यावर लक्षात येते. आपण ज्या आलिशान घरात राहायला जातो ते यांच्या जीवावर उदार होऊन करण्यामुळे शक्य होते. पण त्यांची स्थिती काय आहे. राहायला टीनाची झोपडी, उघड्यावर अंघोळ, रस्त्याच्या कडेला एखादे कापड अंथरूण लहान बाळाला झोपवणे. उघड्यावर लाकडाच्या काड्या पेटवून स्वयंपाक करून जेवणे. इतका त्रास असून सुद्धा हे लोक मजेत आयुष्य जगतात. मालकांना काय दिवसभर काम करणारे मजूर हवेच असतात. एखाद्याचा दुर्घटनेत मृत्यू झाल्यास सरकार आणि मालक दोन-चार लाख त्यांच्या कुटुंबाला देतात आणि त्यांचे तोंड बंद करतात. पण त्यांच्या सुरक्षिततेबद्दल काहीच योजना आखत नाहीत. विस्थापित मजुरांबद्दल सगळेच बेफिकीर असतात. घरचे दारिद्र्य त्यांना असा धोका पत्करायला भाग पाडते. हे चक्र पोटासाठी असेच सुरू राहणार.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

●● ●●

## काँग्रेस पक्षाला ना धोरण, ना राजकीय इच्छाशक्ती

मुंबईत झालेल्या २६/११ च्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणल्यानंतर काँग्रेस पक्षात नुसती अस्वस्थता पसरली आहे. याचा परिणाम म्हणा की केंद्रीय, राज्यस्तरीय काँग्रेसच्या नेते मंडळींकडून रोज वाट्टेल ती विधाने, प्रतिक्रिया या विषयावर ऐकण्यास येत आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी तर दहशतवादी तहव्वूर राणाचा मानवाधिकार जपला जावा असे म्हटले आहे. काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी तहव्वूर राणाला आणायला पंधरा वर्षे का लागली? महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर मुंबईमध्ये त्याचा उपयोग करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करतील, असे म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार २०१४ मध्ये केंद्रात आल्यानंतर खऱ्या अर्थाने या विरुद्ध परत एकदा कारवाईस सुरुवात झाली होती. याचा परिणाम मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी दहशतवादी तहव्वूर राणाला आज भारतात आणले गेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या होकारामुळे हे शक्य झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काँग्रेस पक्षाला ना धोरण, ना नीती यामुळे काँग्रेस पक्षाने ज्या काही चुका केल्यात त्याचा परिणाम इतक्या वर्षांनंतरही देश भोगत आहे. आज काँग्रेस पक्ष आणि त्याचे राट्रीय नेतृत्व आपली मुस्लिम व्होट बँक शाबूत ठेवण्यासाठी देशातील मोठ्या समाजाला चुकीचे ठरवत असल्यानेच चित्र देशात सातत्याने गेल्या तीन दशके दिसत आहे. एकंदरीतच आजचा काँग्रेस पक्ष एक पारिवारिक पक्ष झाला असून पक्षाची अवस्था ना धोरण ना कोणती राजकीय इच्छाशक्ती अशी झाली आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)


# गेवराई येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन

## स्वामी भक्तांसह भाविकांनी सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ एप्रिल**

अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज परब्रम्ह सचिदानंद स्वरुप सद्गुरु अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमीत्त दि.२० एप्रिल ते दि.२६ एप्रिल दरम्यान गेवराई येथील दत्त नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी स्वामी भक्तांसह भाविकांनी सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित गेवराई येथे दि.२० एप्रिल पासुन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमीत्त सेवा केंद्रात ७ दिवसीय सप्ताह कालावधीत ,सामुहिक गुरुचरित्र पारायण, यज्ञ याग, गणेश याग, मनोबोध याग, गिताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग, मल्हारी याग, प्रहर सेवा सह अदि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि २६ रोजी पुण्यतिथी उत्सव निमित्ताने सकाळी साडे दहाच्या नैवेद्य आरती सह पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताह कालावधीत सेवेकरी यांनी स्वामी चरणी सेवा रुजु करुन पुण्यतिथी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन गेवराई केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.




# सुशी (व) येथे अखंड हरिनाम सप्ताह



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ एप्रिल**

स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाने सुशी (वडगाव) येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी महंत ह.भ.प.वै.महादेव महाराज यांच्या आशीर्वादाने व महंत ह.भ.प.गुरुवर्य शिवाजी महाराज नारायणगडकर यांच्या प्रेरणेने व महंत ह.भ.प. दत्तात्रय महाराज गिरी व श्री ह.भ.प.महंत संभाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताह व गाथा भजन व भागवत कथेस रविवार दि.२० एप्रिल रोजी प्रारंभ झाला आहे. तरी भाविकांनी पावन हनुमान मंदिर, सुशी येथे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ, भजनी मंडळ तसेच सप्ताह कमिटी सुशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहतील पहाटे ४ ते ६ काकडा, ७ ते ८ विष्णु सहस्त्रनाम, १० ते ११ गाथा भजन, ११ ते २ श्रीमद भागवत कथा ५ ते ६ हरिपाठ व रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन व नंतर जागर होईल. सप्ताहात भागवताचार्य जगदिशानंद महाराज शास्त्री यांची श्रीमद् भागवत कथा होईल तर या सप्ताहात पुढीलप्रमाणे किर्तन सेवा रविवार दि.२० एप्रिल ह.भ.प.कुमार म.ठोसर, सोमवार दि.२१ माऊली म.सजगने, मंगळवार दि.२२ प्रल्हाद म.महालकर, बुधवार दि. २३ लक्ष्मण महाराज पाटील , गुरुवार दि.२४ सतिष म. ऊरणकर, शुक्रवार दि.२५ ह.भ.प. संभाजी महाराज , शनिवार दि.२६ श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता म.गिरी तर रविवार दि.२७ एप्रिल रोजी दुपारी ११ ते १ यावेळेत ह.भ.प.महंत प्रेममुर्ती गुरुवर्य शिवाजी महाराज नारायणगडकर यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद वाटप होईल तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सुशी (व) पंचक्रोशी परिसर व समस्त ग्रामस्थ मंडळ सुशी (व) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय आहे - महंत शिवाजी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**नवगण राजुरी दि.२१ एप्रिल**

संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर,संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# खडकी येथे श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ एप्रिल**

गेवराई तालुक्यातील खडकी येथे तिर्थक्षेत्र दर्जा 'क' असलेल्या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे करण्यात आले आहे. कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला अभिषेक, छबिना मिरवणूक, कुस्तीचा आखाडा यासह यावर्षी जुन्नर येथील स्वरसंगम आर्केस्ट्रा यांचा सुंदर असा गायन व नृत्याविष्काराचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या यात्रोत्सवाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



खडकी येथे श्री काळभैरवनाथ मंदिर असून या मंदिराला क दर्जा प्राप्त आहे. दरम्यान श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सव हा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी देखील दि.२१ रोजी सकाळी पायी चालत जाऊन कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला स्नान करून अभिषेक घालण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी गावातूनच छबिना मिरवणूक काढली जाणार आहे. यानंतर जुन्नर तालुक्यातील नावाजलेला व सध्या महाराष्ट्रात धुमाकुळ घालत असलेला स्वरसंगम हा आर्केस्ट्रा आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच दि.२२ रोजी सायंकाळी तीन वाजता कुस्तीचा आखाडा आयोजित करण्यात आलेला आहे. तरी या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला जाणार असून पंचक्रोषीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने यात्रेला उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असेल आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीचे सचिव संतोष थोरात, साईनाथ उघडे, भास्कर सानप, सतिश उघडे, विनोद नागरगोजे, प्रकाश काशिद आदींसह ग्रामस्थांनी केले आहे.

# केजच्या नगराध्यक्षा सिता बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हारून इनामदार हातात बांधणार राष्ट्रवादीचे घड्याळ

## इनामदारांच्या माध्यमातून केजमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी होणार आता भरभक्कम

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२१ एप्रिल**

केजच्या राजकीय परिघावर मोठी घडामोड होताना दिसत आहे. येत्या २२ एप्रिल रोजी केजमध्ये राजकीय भूकंप होत असून केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हरूनभाई इनामदार यांनी जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करत केज शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या निर्णयामुळे केज शहराचे व बीड जिल्ह्याचे राजकीय समीकरण बदलणार आहे. केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हरुणभाई इनामदार यांचा पक्षप्रवेश सोहळा मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथील वानखेडे स्टेडियम येथे होणार आहे.



केज शहराची सत्ता प्रामुख्याने जनविकास परिवर्तन आघाडीकडे आहे. जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व संस्थापक हरून भाई इनामदार यांच्या नेतृत्वाला केज शहराने पसंती दिलेली आहे. १४ फेब्रुवारी २०२२ साली नगराध्यक्ष पदाची सूत्र स्वीकारल्यानंतर केज शहरात विकासाचा झपाटा लावलेला आहे. बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती पैकी क्रमांक एकची नगरपंचायत केज नगर पंचायत ठरली आहे. गेल्या तीन वर्षात विकास कामात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे.केज शहराला नवी ओळख मिळवून देण्यात हरूनभाई इनामदार यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. गेल्या तीन वर्षात स्वच्छतेच्या बाबतीत असेल, पाणीपुरवठ्याच्या बाबतीत असेल किंवा गावातील विकासाच्या बाबतीत असेल स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जनसामान्यांचा विश्वास संपादन करून सामाजिक व राजकीय पटलावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. केज शहराचा कायापालट करण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्ष आणि नेतृत्व असणे आवश्यक आहे म्हणून केजच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व हरुणभाई इनामदार यांनी योग्य असा राजकीय पर्याय निवडण्याचा अधिकार आपल्या तमाम कार्यकर्ता वर्गाकडे सुपूर्द केला होता. अखेर सर्वानुमते इनामदार यांनी विकासासाठी सत्ता आणि सत्तेसाठी विकास हे ब्रीद समजून घेत उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.त्या अनुषंगाने येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथे वानखेडे स्टेडियम या ठिकाणी नगराध्यक्ष सिताताई बनसोड, हरूनभाई इनामदार पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, ना.दिलीप वळसे पाटील, आ. धनंजय मुंडे,आ. विजयसिंह पंडित, आ.प्रकाशदादा सोळंके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पक्षप्रवेशाची जोरदार तयारी इनामदार समर्थकांकडून केली जात आहे.शेकडो गाड्यांचा ताफा यात असणार आहे. इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार आहे.राष्ट्रवादीत अजितदादा गटाकडे प्रभावी व वक्तृत्व संपन्न मुस्लिम चेहरा नाही म्हणून हरून भाई इनामदार यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये होणार आहे. बीड जिल्ह्यात इनामदार यांना मानणारा मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या व्होट बँकेला इनामदार यांच्या माध्यमातून फायदा होणार आहे.आगामी काळात राष्ट्रवादीची बुलंद तोफ म्हणून इनामदार यांच्याकडे पाहिले जाणार आहे शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुद्धा तेवढी ताकद हरूनभाई इनामदार यांना देणे गरजेचे आहे. सध्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व संस्थापक हरुनभाई इनामदार तसेच केज नगर पंचायत मधील जनविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्ते, पदाधिकारी अनेक गावचे सरपंच, उपसरपंच ,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हाइस चेअरमन याशिवाय जिल्हाभरातील असंख्य कार्यकर्ते इनामदार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे अजितदादांची राष्ट्रवादी आणखी भक्कम होणार असल्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

# सौ.के.एस.के. महाविद्यालय बीड एनसीसी च्या १६ विद्यार्थ्यांची एकाच वर्षात विविध क्षेत्रात निवड व सार्जंट जाधव दीपक ईश्वर यांचे अभिनंदन!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ एप्रिल**

सौ.के.एस.के.महाविदयालय बीड हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या भविष्यासाठी नवीन पूर्ण उपक्रम सतत राबवत असते.येथील एन.सी.सी.विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना परिश्रम, अनुशासन, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकता व अखंडते साठीचे सातत्याने प्रशिक्षण दिले जाते.देशाचा एक जबाबदार व सुजाण नागरिक बनण्याचे कार्य सातत्याने या विभागाद्वारे केले जाते.शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रात निवड झालेली आहे. यात आर्मी, नौदल,पॅरा मिलीटरी फोर्स, महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र होमगार्ड सेवा, महाराष्ट्र सुरक्षा बल या क्षेत्राचा समावेश आहे. यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रांजण भरत, देवडकर नितीन, नवले विशाल,सुरेश संतोष, जगताप अभिमान, घोडके स्वप्नील, जाधव दीपक,तिपटे रामेश्वर, तिपटे लक्ष्मण, सुरवसे गोविंद, लांडे विक्रम, उबाळे मुकेश, तोंडे गणेश, माने रमेश, वाघ शंतनू, देवरकोंडे सचिन, इत्यादीचा समावेश आहे. या विभागास व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणास, संस्थेच्या सन्माननीय उपाध्यक्षा प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे उपाध्यक्ष डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर,५१ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सुनील बी. रेड्डी यांचे सातत्याने विशेष मार्गदर्शन लाभले.आज महाविद्यालयाच्या वतीने जाधव दीपक ईश्वर यांचा प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उप-प्राचार्य डॉ. संजय पाटील देवळणकर,उप-प्राचार्य डॉ.नारायण काकडे , कार्यालयीन अधीक्षक डॉ. विश्वंभर देशमाने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, एनसीसी प्रमुख कॅप्टन डॉ. बालासाहेब पोटे यांनी सत्कार केला व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता मंत्र्यांना निवेदन

## संचालक ॲड.रविंद्र कानडे यांनी मांडल्या संस्थांच्या व्यथा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ एप्रिल**

येथील लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या तेलगाव शाखेच्या नवीन वास्तू उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री श्री बाबासाहेब पाटील हे दिनांक २१ एप्रिल रोजी आले असता पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता सहकार मंत्र्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन चे संचालक ॲड.रविंद्र कानडे यांनी सविस्तर निवेदन दिले यावर विचार नक्कीच करू असे आश्वासन सहकार मंत्र्यांनी दिले आहे.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था व फेडरेशन यांच्या कायद्यामध्ये आवश्यक तो बदल व्हावा वसुली कायदे यामध्ये देखील सुधारणा व्हावी कलम १०१,१५६, व विक्री अधिकारी यांच्या कायद्यामध्ये सुधारणा होऊन भक्कमपणे संस्थांना काम करता यावे तसेच संस्थेच्या गुंतवणुकी बाबत सुरक्षितता तसेच सभासदांच्या ठेवीना विमा संरक्षण मिळावे त्याचबरोबर योग्य कर्जदार सभासद निवडता यावा करिता सिबिल सारख्या कंपन्या संस्थांना जोडता याव्यात व सहकार समृद्ध होण्यासाठी आवश्यक त्या सर्व इतर बाबींच्या सुधारणा करण्यासंदर्भातले सखोल मागण्यांचा उल्लेख या निवेदनात करण्यात आला असुन प्रसंगी राज्याचे सहकार मंत्री यांनी देखील सहकारात्मक भूमिका घेऊन सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सरकार निश्चितच काम करेल असे आश्वासन दिले यावेळी आ. प्रकाशदादा सोळंके , जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपजिल्हा निबंधक समृद्ध जाधव यांच्या समवेत निवेदन सादर करण्यात आले.

### सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल तातडीने बोलावली बैठक

निवेदनाची तात्काळ दखल घेऊन मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ फेडरेशनचे पदाधिकारी आणि मंत्रालयीन अधिकारी यांची दि. २३ रोजी बैठक बोलावली असल्याची माहिती फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी दिली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ एप्रिल**

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी याच संस्थेचा 'व्हि.जे.आरक' या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, 'प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र' या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम आणि 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन- २०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' द्वितीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या उपरोक्त संस्थेचा सलग हा चौथा पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाला आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनिय कारकिर्दीची दखल घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबत अकॅडमीचे सचिव प्रकाश घादगिने यांनी कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत डॉ.भालचंद्र ब्लड बँक, बसस्टँड मागे, लातूर येथे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य



अकादमीचे पहिले साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापुर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २१ हून अधिक पुस्तके, विविध वृत्तपत्र, नियतकालिकांतून लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे तिनशेहून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच 'परिवर्तन संशोधन' मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. आगामी काळात ११ विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. या सर्व विषयांवरील त्यांच्या ग्रंथसंपदा प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन आदी विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

# ब्रह्माकुमारीज केंद्राच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित रहा-अनितादिदी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ एप्रिल**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नवीन 'प्रभू दर्शन भवन' वास्तूचे लोकार्पण सोहळा दि.२२ एप्रिल मंगळवार रोजी संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी ब्रह्मकुमारी मुख्य ठिकाण माउंट आबू येथील राजयोगिनी उषा दीदीजी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या तसेच मा.आ. श्री.प्रकाशदादा सोळंके आमदार माजलगाव, तसेच प्रमुख पाहुणे मा. श्री. मोहनराव काका सोळंके, माजी आमदार माजलगाव, राजयोगिनी सोमप्रभा दीदीजी संचालिका उपक्षेत्र सोलापूर यांच्या हस्ते ब्रह्मकुमारी सेंटरचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. याकरिता पत्रकार परिषद घेण्यात आली.



यामध्ये आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताण-तणाव, नैराश्य,भय, दुःख, अशांती कशी कमी करता येईल तसेच व्यसनमुक्त करणे, डिप्रेशनमुळे होणाऱ्या आत्महत्या पासून रोखणे, योग्य मार्गदर्शन करणे हे सर्व कार्य विनामूल्य ईश्वराचे ज्ञान मिळवण्यासाठी ब्रह्मकुमारीद्वारे 'राजयोग मेडिटेशन' विनामूल्य शिकवल्या जाते. माजलगाव शहरांमध्ये 'प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे' नवीन वास्तू सेवाकेंद्र प्रभू दर्शन भवन उद्घाटन करण्यात येत आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये माजलगाव सेवा केंद्र संचालिका अनिता दीदी, बीड सेवा केंद्र संचालिका प्रज्ञादीदी यांनी दिली. पत्रकार परिषदेच्या शेवटी सर्व पत्रकार बांधवांना कुरूडवाडी सेवा केंद्र संचालिका, गोदावरीदीदी यांनी मेडिटेशनचा अनुभव करून घेतला. शेवटी उपस्थित पत्रकार व बंधू-भगिनींचे आभार शिलादीदी यांनी मानले.

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रवासी महिलेची हरवलेली पाच लाखाची पर्स परत; चालकाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२१ एप्रिल -**

प्रवासी महिलेची शिर्डी-उदगीर बसमध्ये हरवलेली पाच तोळ्याचा दागिना आणि सात हजार रुपये रोख असलेली पर्स चाकूर तालुक्यातील कबनसांगवी येथील एसटी चालक शरद गणपतराव निला यांनी प्रामाणिकपणे परत करून आदर्श प्रामाणिकपणाचे उदाहरण घडवले आहे.

घटना अशी की, शिर्डी येथून राहूरीला



लग्नासाठी निघालेल्या एका महिलेकडील पर्स ती घाईघाईत बसमध्ये विसरून गेली. पर्समध्ये सुमारे पाच लाखांचा ऐवज होता. ही पर्स बस चालक शरद निलांच्या लक्षात आली. त्यांनी प्रवासी महिलेचा दहा किलोमीटर पाठलाग करत, शिर्डी-पंढरपूर बस थांबवून, तिची पर्स सुरक्षितरित्या परत केली.

राहता बस स्थानकावर वाहतूक नियंत्रण कक्षाधिकारी किरण राऊत यांच्या समोर पर्स परत देण्यात आली. महिलेने आभार मानून बक्षीस देण्याचा आग्रह धरला, मात्र निलांनी हे माझे कर्तव्य आहे म्हणत नम्रपणे नकार दिला. त्यांच्या या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### माने कुटुंबाचे रामदास आठवले यांच्याकडून सांत्वन

**निलंगा, दि.२१ एप्रिल -**

वेणूताई यशवंतराव चव्हाण प्राथमिक आश्रमशाळा व प्रतिभाताई पवार माध्यमिक आश्रमशाळेचे अध्यक्ष विलास बाबुराव माने यांचे शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्याबद्दल केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री, रिपाई नेते रामदासआठवले यांनी शनिवार निलंगा येथील उपरा या निवासस्थानी कत्तिकार विलास माने यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. याप्रसंगी माने यांच्या पत्नी कलावतीमाने, मुलगा विकास माने, सुन भाग्यश्री माने, मुलगी आशा जाधव व उषा जाधव, जावाई उपस्थीत होते. यावेळी शिवकांत चिकुर्ते, चंद्रकांत चिकटे, देविदास कांबळे, बाबासाहेब कांबळे, प्रा. व्यंकट कीर्तने, प्रा. जितेंद्र बनसोडे, रजनीकांत कांबळे, डॉ. अरविंद भातांब्रे, अंकुश ढेरे, अरविंद कांबळे, प्रमोद ढेरे, लहू ढेरे, संदीप कांबळे, रमेश कांबळे, शिवराज आष्टुरे, प्रा. रोहीत बनसोडे आदी उपस्थित होते.

### विश्वेश्वरय्या आयटीआयच्या १०४ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे निवड

**औसा, दि.२१ एप्रिल -**

सत्वा मॅनपॉवर सर्विसेस व औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण संस्था संचलित विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलमला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेलच्या माध्यमातुन घेण्यात आलेल्या कॅम्पस ड्राईव्ह मुलाखतीमध्ये लातूर जिल्हा व परिसरातील आयटीआय, पॉलिटेक्निक व पदवी अभियांत्रिकीच्या १०४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये पुणे येथील मल्टिनॅशनल कंपन्याच्या माध्यमातुन झालेल्या मुलाखतीमध्ये १५८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यापैकी १०४ प्रशिक्षणार्थ्यांची पुणे येथील मल्टिनॅशनल नामांकित कंपनीमध्ये निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्वर धाराशिवे, महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धारशिवे, प्राचार्य गोपाळ दंडिमे, परमेश्वर गवळी, सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



### रामदास आठवले यांचा राष्ट्रवादीच्या वतीने सत्कार

**उदगीर, दि.२१ एप्रिल -**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे उदगीर शहरात आले असता त्यांचा येथील अजित पवार गट उदगीर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, ज्ञानेश्वर बिरादार, अज़हर मोमीन, हिपजु रहेमान हाशमी, शहबाज शेख, युसुफ बागवान यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### शिरूर अनंतपाळमध्ये अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**शिरूर अनंतपाळ, दि.२१ एप्रिल -**

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) शी, अनंतपाळ तालुक्याचे भूमिपुत्र राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू सूरज चव्हाण प्रदेश युवक अध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहरातील ३० कार्यकर्ते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वात जाहीर प्रवेश केले. यामध्ये प्रदेश सचिव तुषार मादळे यांनी हा प्रवेश करून घेण्यात सक्रिय सहभाग नोंदवला. यात प्रमोद बाणाटे, ज्योती बाणाटे, गौतम कांबळे, विष्णू गायकवाड, कार्तिक जाधव, अविनाश जाधव, रोहित गायकवाड, योगेश माने, शुभम गायकवाड, गणेश भोजने, बालाजी शिदाळकर, बापू गायकवाड, मल्हारी गायकवाड, उजेडे एम, आदी कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे स्कार्फ घालून त्यांचा प्रवेश करून घेण्यात आला. यावेळी तालुका ध्यक्ष विठ्ठलराव पाटील, अनिल देवगरे, शेख महेताब, ज्ञानोबा मोगले, ऋत्विक सांगवे, नंदकुमार तांबोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## डिजीटल युगातही डाकघराचा विश्वास कायम : आ. अभिमन्यू पवार

▸▸ औसा येथील उप डाकघरचे लोकार्पण...

▸▸ लातूर जिल्ह्यासाठी वेगळ्या डाक विभागासाठी पाठपुरावा करणार...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२१ एप्रिल -**

१०-१५ पैशाचे पोस्ट कार्ड आंतरदेशी पत्र, पाकिट, तार अशा अनेक सोयीतून सर्वसामान्य जनतेपासून मोठ्या उद्योगपतीपर्यंतच्या घराघरात, मनामनातून विश्वास संपादन करीत आजच्या डिजीटल युगातही 'डाकघर' ने विश्वास कायम टिकविला आहे, असे मत आ. अभिमन्यू पवार यांनी व्यक्त करुन कौतुक केले.

औसा येथील उप डाकघरचा लोकार्पण समारंभ सोमवार दि.२१ एप्रिल रोजी झाला. त्यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते. भाजपाचे जेष्ठ नेते सुशील बाजपाई कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. धाराशिव विभागाचे अधीक्षक संजय अंबेकर, उपअधीक्षक श्रीकांत माने, शाम गायकवाड, डाक अधिकारी सचीन स्वामी, डी.एन. मुंडे, नाटकर, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, सुनील उटगे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, बाजार समितीचे उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे उपस्थित होते.

आ. पवार म्हणाले, डाक विभागाची विश्वासाहर्ता व बँकिंग व्यवहारातून या विभागाने कात टाकली आहे. शासनाच्या विविध योजना या पोस्टाच्या माध्यमातून होत असल्याने समाजाशी नाळ जोडली गेली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात पोस्ट विभागाच्या जागा असून या शासनाच्या मालमत्ता आहेत. या जागेवर अतिक्रमण होऊ नये. यासाठी पोस्ट विभागाचे कार्यालये, निवासस्थाने नव्याने झाले पाहिजे. तसेच ज्या ठिकाणी या विभागाच्या मोकळ्या जागा आहेत. त्या जागेभोवती संरक्षण भिंत बांधून या जागा सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

यावेळी विविध योजनेतील लाभार्थ्यांना पासबुकाचे वितरण उपस्थित करण्यात आले.

### पोस्ट विभागातून ४८ योजना सुरू : संजय अंबेकर

पोस्ट विभागाच्या माध्यमातून ४८ विविध योजनेअंतर्गत काम केले जात असून धाराशिव विभागामध्ये २ हजार डाक कर्मचारी काम करतात. धाराशिव-लातूर या दोन जिल्ह्यासाठी हा विभाग असून सुमारे २७४ किलोमीटरचा आहे. त्यामुळे भौगोलिक परिस्थिती पाहता लातूर जिल्ह्यासाठी वेगळा विभाग व्हावा. अशी आमची मागणी आहे. औसा तालुक्यासाठी २० शाखा असून १५० खेड्यासाठी ४१ कर्मचारी काम करीत आहेत. ११ हजार लोकसंख्येच्या मागे एक कर्मचारी काम करीत आहे. या विभागामार्फत सुरू असलेल्या योजनेचा लाभ नागरिकांनी घेण्याचे आवाहन धाराशिव विभागाचे अधीक्षक संजय अंबेकर यांनी यावेळी बोलताना केले.

### जिल्ह्यासाठी वेगळ्या विभागाची निर्मिती करणार

लातूर जिल्ह्याच्या निर्मिती पुर्वी धाराशिव जिल्ह्याशी जोडला होता. लातूर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर लातूर जिल्ह्यासाठी वेगळ्या विभागाची निर्मिती होणे आवश्यक होते. मात्र असे झाले नाही. लातूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या माध्यमातून २७४ किलोमीटरच्या पट्यात काम करणे कर्मचाऱ्यांना गैरसोयीचे होते आहे. यामध्ये सुरळीतपणा यावा. यासाठी लातूर जिल्ह्यासाठी वेगळ्या डाक विभागाची निर्मिती व्हावी. आणि औसा येथील उप डाकघराच्या मालकीच्या मोकळ्या जागेत कर्मचाऱ्यांना निवासस्थानच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध व्हावा. यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन आ. पवार यांनी दिले.

## रामदास आठवले यांनी केली विश्वशांती बुध्द विहाराची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१ एप्रिल -**

उदगीर मतदार संघाचा भौतिक विकास करण्यासाठी आ. संजय बनसोडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात जीवाचे रान करून मतदारसंघाचा कायापालट केला आहे.

शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले असून त्यातच उदगीर सारख्या ठिकाणी 'विश्वशांती बुद्ध' विहाराची



निर्मिती केली व या विहाराच्या लोकार्पण सोहळ्याला महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना बोलावून माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी एक इतिहास निर्माण केला असल्याचे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील 'विश्वशांती बुध्द' विहारातील सदिच्छा भेट देवून पाहणी करताना बोलत होते. यावेळी तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, चंद्रकांत चिकटे, देविदास कांबळे, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, ज्ञानेश्वर बिरादार, हिपजु रहेमान हाशमी, नरसिंग कदम, शाहबाज शेख, आदी उपस्थित होते.

## 'उदयगिरी'च्या विद्यार्थ्यांची उज्वल कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१ एप्रिल -**



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एप्रिल २०२५ मध्ये राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटी) द्वारे घेतलेल्या जेईई मेन्स सेशन-२ परीक्षेत उज्वल काम गिरी करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. ध्रुव पारसेवार याने ९९.९५ पर्सेंटाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर मारमवार वेदिका (९२.२४), सायली सोनकांबळे (८६), विश्वजीत पाटील (८५.२९), वैष्णवी मोरे (८५), ओम सुगंधी (८०), शुभम उगीले (७९.४३), संस्कार रेड्डी (७९), अभिषेक अणकल्ले (७६.७८) आणि हर्षल कांबळे (७५) यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली.

गुणवंत विद्यार्थ्यांचे मल्लिकार्जुन मानकरी, डॉ. रेखा रेड्डी, रामचंद्र तिरुके, अॅड एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया यांनी अभिनंदन केले.

### दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२१ एप्रिल -**

चाकूर ग्रामीण रूग्णालयात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रीया शिबीर माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त दि.१८ एप्रिल रोजी चाकुर तालुका कॉंग्रेस, शहर कॉंग्रेस व ग्रामीण रुग्णालय चाकुर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबीर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेऊन सामाजिक उपक्रमाने दिलीपराव देशमुख यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी २५२ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून यामध्ये ७५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती संयोजन समितीने दिली.

## मुलांनो व्यायाम करा व झोप घ्या पण मोबाईल टाळा : डॉ पांडुरंग कदम

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२१ एप्रिल -**

लहान वयातच आपले आरोग्य सुधारण्यासाठी मुलांनी व्यायाम करावा, मैदानी खेळ खेळावेत मस्त झोप घ्यावी पण मोबाईल चा वापर कमी करावा. तरच आरोग्य आणि भविष्य चांगले राहील करा कारण आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आणि ती लहानपणापासूनच जपता येत असल्याचे मत प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. पांडुरंग कदम यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळगाव येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन आरोग्य तपासणी शिबिराचे उदघाटन प्रसंगी डॉ. कदम बोलत होते.



संतुलित आहार, रोजचा व्यायाम, वेळेवर झोप आणि मोबाईल व स्क्रीनचा कमीतकमी वापर याबाबत सविस्तर माहितीत्यांनी या वेळी दिली. चिप्स, कोल्ड ड्रिंक यांसारख्या फास्ट फूड्सपासून दूर राहा आणि घरचं पौष्टिक अन्न खाण्याचा सल्ला मुलांना दिला. शिबिराच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभंग जाधव हे होते. नेत्ररोग तज्ञ डॉ. रामेश्वर चामले, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश्वरी सोळंके, डॉ. शिवानंद गुट्टे, डॉ. वैभव आकरुपे यांनी बालकांच्या आरोग्याची तपासणी केली. याप्रसंगी सरपंच छाया घोगरे, शादुल शेख, धनंजय कोत्तावार, बालाजी करंडे, कालन शेख, रहीमखा पठाण, पल्लवी कांबळे आदि उपस्थित होते. या शिबिरात विद्यार्थ्यांचे डोळे, दात, हृदय, अस्थी, उंची, वजन, पोषण आणि स्वच्छतेची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी तुरेवाले, सूत्रसंचालन शिवदास रोडगे, आभार प्रदर्शन लक्ष्म. विभूते, यांनी केले.

शिबिर यशस्वीतेसाठी बालाजी गांजरे, महादू कंदे, नागेश कंदे, गोविंद केसाले, बलभिम गायकवाड, महानंदा पन्हाळे, गंगासागर गायकवाड, दशरथ जाधव, घनश्याम स्वामी, रोहीत करंडे, छाया दराडे, मोहीनी सोनेवाड परिश्रम घेतले.

## निपुत्रिक जोडप्याने टेस्ट ट्यूब बेबी प्रणालीचा उपयोग करावा : डॉ. सांगवीकर



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२१ एप्रिल -**

विज्ञानाने केलेल्या प्रगतीच्या जोरावर वंधत्व निवारण करता येते. ज्या दाम्पत्यांना संतती सुख नाही. निपुत्रिक दांपत्याने टेस्ट टेस्ट ट्यूब बेबी प्रणालीचा वापर करावा असे आग्रही प्रतिपादन टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर यांनी केले.

लातूरच्या जी.जी. बिराजदार हॉस्पिटल, स्त्री व बाल रुग्णालय निर्मिती टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या वतीने यशवंत विद्यालयात आयोजित निशुल्क वंधत्व निवारण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून डॉ. सांगवीकर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टागोर शिक्षण समितीच्या सहसचिव प्रा.डॉ. सुनिता चवळे लोहारे, व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अंजली उगीले, डॉ. ऋषिकेश पाटील, डॉ. मीनाक्षी करकनाळे, डॉ. नेहा पाटील, डॉ. वर्षा भोसले, डॉ विशाखा पलमटे, डॉ. नीता गुनाले, डॉ. नाथराव कराड, डॉ. नरेंद्र जवणे, प्राचार्य गजानन शिंदे, शिबिर संयोजक डॉक्टर सुवर्णा बिराजदार, डॉ. पद्मसिंह बिराजदार, डॉ. प्रियंका नीला यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

या शिबिरात अहमदपूर तालुका, चाकूर तालुका, लोहा तालुका, जळकोट तालुक्यातील ५५ जोडप्यांची तपासणी करून कारण मीमाणसा व समुपदेशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर संयोजक डॉ. सुवर्णा बिराजदार- दहिटणकर यांनी सूत्रसंचालन कपिल बिराजदार यांनी तर आभार डॉ. पद्मसिंह बिराजदार यांनी मानले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्योती शिंदे, डॉ. नेहा भालेराव, डॉ. आएशा शेख, डॉ. पुनम शेख, संगम निला, गजानन निला, अशोक गायकवाड, श्रीशैलेश स्वामी, कार्तिक स्वामी यांच्यासह जी.जी. बिराजदार हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उन्हाचा पारा चढल्याने वऱ्हाडी मंडळी घामाघुम

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१ एप्रिल -**

एप्रिल महिन्यात सध्या लग्नसराईची धामधूम सुरू आहे. एकीकडे तापमानाचा पारा ४० च्या वर गेला असतानाही लग्नाची धामधूम वऱ्हाडी मंडळींचा चांगलाच घाम काढत आहे. तर दुसरीकडे अधूनमधून येणाऱ्या वादळी वाऱ्यामुळे विवाह सोहळ्यांची दाणादाण उडत आहे.

यावर्षी एप्रिल व मे महिन्यात लग्नाच्या अनेक तिथी आहेत. सध्या वाढत्या उन्हामुळे अंगातून सारखा घाम निघत असल्याने वरातीही आटोपत्या घ्याव्या लागत आहेत. सर्वत्र विवाह सोहळ्यांची लगबग पहावयास मिळत आहे. दुसरीकडे सध्या कमालीच्या वाढलेल्या तापमानामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. अशात या लग्नतिथी असल्यामुळे वधू आणि वरांकडील वऱ्हाडींचा चांगलाच घाम निघत आहे. शिवाय लग्नकार्यावर अवकाळीचे संकट घोंघावत आहे. त्या धास्तीनेही वर-वधू पित्याची झोप उडाली आहे. एरवी सामान्य परिवारातील अनेक जण दुचाकीने लग्नाला हजेरी लावत असतात. मात्र, उन्हात दुचाकीवरी प्रवास परवडणारा नसल्याने अनेक जण भाड्याने चारचाकी घेऊन नात्यातील लग्नाला उन्हातही हजेरी लावत आहेत. लग्नाच्या ठिकाणी वऱ्हाडी मंडळीची व्यवस्था मंडपातच केली जात असल्याने तेथेही उन्हाच्या झळांचा सामना करावा लागतो.

अनेक वऱ्हाडी लग्नघरी गेल्यानंतर सावलीसाठी शेतातील झाडांचा सहारा घेत वाढत्या तापमाना पासून बचाव करीत असतांना दिसून येत आहेत.

## कर्जबाजारीपणा व नापीकीला कंटाळून दळवेवाडीच्या शेतकऱ्याची आत्महत्या; आर्थिक मदतीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२१ एप्रिल -**

चाकूर तालुक्यातील दळवेवाडी येथील शेतकऱ्याने सततची नापीकी व कर्जाला कंटाळून स्वतःच्या शेतात जढाळा येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

दळवेवाडी येथील शेतकरी केशव सिताराम होळे (वय ४२) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. केशव होळे यांच्यावर झरी बुद्रुक शाखेतील स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे ४८ हजार रुपयांचे कर्ज होते.

कर्ज परतफेडीसाठी बँकेकडून फोन येत असल्याने माझ्या पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे, असा आरोप मयताच्या पत्नीने केला आहे. झरी येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखाधिकार्याशी संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलना नाही. यावर्षी केशवला कुटुंबातील दवाखान्याचा खर्च असल्याने व नापीकीमुळे केशवने बँकेचे कर्ज फेडू शकले नाही. पण बँकेकडून कर्ज भरण्यासाठी सतत फोन येत होता आणि केशव कडे पैसे नव्हते त्यामुळेच केशवने हे टोकाचे पाऊल उचलले असून केशव होळे हा अत्यंत प्रमाणीक होता असे गावातील नागरीकांनी सांगितले.



चाकूर तालुक्यातील दळवेवाडी येथील शेतकरी केशव होळे यांना दीड एकर कोरडवाहू शेती आहे. निसर्गाचा लहरी पणाने शेतात सततची नापिकी आणि कर्जबाजारी यामुळे वैतागलेल्या शेतकरी केशवने शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. केशव सतत म्हणायचा की मला माझ्या मुलीचे लग्न करायचे आहे.

पण कर्जबाजारीपणाला व नापीकीला कंटाळून मुलीचे लग्न करण्याचे कार्य बाकी सोडून केशवने आपले जेवण संपविले. केशव यांच्या पश्चात आई, वडील, एक मुलगी, दोन मुले असा परिवार असून केशवच्या कुटुंबाची हलाखीची परिस्थिती आहे.

त्यामुळे केशवच्या मुलीच्या लग्नासाठी व कुटुंबाला दुखःतून बाहेर येण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करवी, अशी मागणी कुटुंबियांनाकडून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तक्रार करणाऱ्या आमदारांनी आगोदर पडताळणी करावी

## पालकमंत्री अतुल सावे यांचा आमदारांना सल्ला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ एप्रिल-**

तांडा वस्ती निधीवरून सत्ताधारी पक्षातील आमदारांनी तक्रार केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड जिल्ह्यातील ७ कोटी २५ लाख रुपयाच्या कामाला स्थगिती दिली. दरम्यान आमदारांच्या तक्रारीवर स्पष्टीकरण देताना पालकमंत्री अतुल सावे चांगलेच भडकले. तांडा वस्ती निधीचा प्रस्ताव हे जिल्हाधिकाऱ्यां मार्फत येतं असतात त्यामुळे तक्रार करणाऱ्या आमदारांनी आगोदर पडताळणी केली पाहिजे असा सल्ला पालकमंत्री अतुल सावे यांनी आमदारांना दिला. पालकमंत्री अतुल सावे हे आज नांदेड दौऱ्यावर आले असता पत्रकारांशी बोलत होते.

तांडा वस्ती सुधार योजनेच्या निधी वाटपाबाबत नांदेड जिल्हयातील महायुतीच्या तीन आमदारांनी तक्रारी केल्या होत्या. त्यात भाजपचे मुखेड मतदार संघातील आमदार तुषार राठोड, किनवटचे आमदार भीमराव केराम आणि शिवसेना शिंदे गटाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर



यांचा समावेश आहे.

आमदारांच्या या नाराजीवर पालकमंत्री अतुल सावे यांनी आज स्पष्टीकरण दिले. नादेंडमधील तांडा वस्ती सुधार योजनेने प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत येतात, त्याला आम्ही मान्यता देतो. तक्रार करणाऱ्या आमदारांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडुन माहीती घेवुन प्रस्ताव आपल्या मतदार संघातील आहे किंवा नाही याची पडताळणी केली पाहिजे असा सल्ला पालकमंत्री अतुल सावे यांनी आमदारांना दिला. त्या कामांना मुख्यमंत्र्यांनी, आणि आम्हीही स्थगती दिली. यात काही अडचण नाही, एकाच मतदार संघातील कामांचा प्रश्न आहे. बाकीच्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडुन माहीती घ्यावी. प्रस्ताव आम्ही मंजूर करत नाही, जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव येतात. सूचवलेली आणि शिफारस केलेली कामे मंजूर केली नाही अशी तक्रार कोणाचीही नाही असे सावे म्हणाले. आमदार तुषार राठोड यांना मागच्या वेळी १ कोटी नव्वद लाखाची कामे दिलेली आहेत. त्यांना पण प्रश्न विचारा, किती निधी आला होता. हे तर नविन आमदार आहेत आता त्यांचे प्रस्तावच आले नसल्याची माहीती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

# संविधान सभागृहासाठी जागेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ एप्रिल-**

प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत नांदेड शहरात प्रस्तावित संविधान सभागृहाच्या उभारणीसाठी जागेचा प्रश्न सध्या ऐरणीवर आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी महापालिकेने शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाची जागा सुचवली होती. मात्र संबंधित महाविद्यालयाने विविध कारणे देत जागा उपलब्ध करून देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे महापालिकेने पर्यायी जागेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र सादर केले असुन या पार्श्वभूमीवर आज नांदेडच्या विश्रामगृहात जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांना निवेदन सादर करत लवकरात लवकर संविधान सभागृहासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या प्राचार्यांना अधिकृत पत्र देत २ हजार चौ. मीटर जागा संविधान सभागृहासाठी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. या पत्रात असे स्पष्ट नमूद करण्यात आले होते की, या सभागृहाच्या माध्यमातून तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनाही भारतीय संविधान, कायदे, सामाजिक समस्या, प्रशासकीय बाबी यांचे सखोल ज्ञान मिळेल. तसेच अल्पसंख्यांक समाजाविषयी समता, एकात्मता आणि सहिष्णुतेबाबत प्रबोधन होईल. तथापि, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाने ही संधी नाकारत, जागा देण्यास नकार दिला आहे. यामुळे केवळ संविधान सभागृहाचाच प्रकल्प अडथळ्यात आला नाही, तर विद्यार्थ्यांना मिळू शकणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक



प्रबोधनाच्या सुवर्णसंधीचाही लाभ हुकला आहे. हे संविधान सभागृह हे ग्रंथालय, म्युझियम, ऑडिटोरियम, भारतीय संस्कृतीचा इतिहास, प्रशिक्षण केंद्र, विपश्यना केंद्र, कायद्यानियमांची माहिती, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, आणि भारतीय संविधानाचे सखोल ज्ञान देणारे एक बहुउद्देशीय केंद्र असणार आहे. नांदेड शहरासारख्या ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या संवेदनशील परिसरात अशा केंद्राची उभारणी अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

यावेळी राज्यसभेचे खासदार अजित गोपछडे, भाजपा संघटन मंत्री संजय कोडगे, महापालिकेचे माजी सभापती किशोर स्वामी, माजी महानगर अध्यक्ष प्रवीण साले उपस्थित होते.

दरम्यान संविधान सभागृह ही केवळ एक इमारत नसून, सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. हे केंद्र संविधानाचा गाभा, कायद्यानियम, सामाजिक समता आणि अल्पसंख्यांक सक्षमीकरणासाठी आधारभूत ठरेल. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर योग्य जागा निश्चित करावी अशी मागणी साहेबराव गायकवाड यांनी यावेळी केली.

## संक्षिप्त वृत्त



### भाजप लोहा उत्तर मंडळाध्यक्षपदी शरद पवार तर दक्षिण मंडळाध्यक्षपदी चंद्रसेन सुरनर

**लोहा** -मतदारसंघातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था ,नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या आदेशानुसार मतदार संघाचे पक्ष निरीक्षक माणिकराव लोहगावे यांच्या मार्गदर्शनाखाली नुतन पदाधिकाऱ्याची निवड जाहिर केली. त्यामध्ये उत्तरमंडळपदी शरद पवार तर दक्षिण मंडळपदी चंद्रशेन सुरनर यांची निवड करुन शहरमंडळपदी गजानन सावकार सुर्यवंशी यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते नागनाथ पाटील चुडावकर,माजी पं.स. सदस्य डॉ. सुनील धोंडगे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केरबा केंद्रे, विजय केंद्रे, बबन हुलसुरे,डी.एन. कांबळे, पिनू चुडावकर, सुधाकर सातपुते,विनय चंदलवाड, ताटे पाटील, मारोती हाडोळीकर,बजरंग यादव,विनोद चंदलवाड,विजय केंद्रे,राहुल बोरगांवकर,सुभाष कंधारे, द्या बंजपल्ले,माधव अनकाडे आदी उपसिथत होते.


### भाजपाच्या किनवट शहर मंडळ अध्यक्षपदी स्वागत आयनेनीवार



**किनवट** -पक्षश्रेष्ठीच्या आदेशानुसार तसेच आमदार भीमराव केराम यांच्या शिफारसीवरून भाजपा किनवट शहर मंडळ अध्यक्षपदी भाजपाचे युवानेते स्वागत आयनेनीवार यांची तर उत्तर विभागाच्या तालुकाध्यक्षपदी उमाकांत कराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवीन तालुका अध्यक्ष नियुक्त केले जात असून तालुका अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याकडे भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे लक्ष लागून होते. दरम्यान २० एप्रिल रोजी पक्षाचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कोडगे, खासदार अशोकराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष अॅड. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रभारी प्रा. किशन मिरासे व जिवन अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात व त्यानंतर लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनता पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठका संपन्न झाल्या.या बैठकीत आमदार भीमराव केराम यांच्या शिफारशीवरून किनवट शहर मंडळाच्या अध्यक्षपदी तरुण तडफदार, युवानेते स्वागत आयनेनिवार यांची तर उत्तर विभागाच्या तालुकाध्यक्षपदी उमाकांत कराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल युवानेते प्रतीक केराम, प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक नेम्मानीवार,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,विधानसभा प्रमुख बाबुराव केंद्रे,सुधाकर भोयर,ओबीसी आघाडीचे जिल्हा सरचिटणीस रमेश बद्दीवार, व्यंकटराव नेम्मानीवार,मुसाखान कोपरेकर,दिनकर चाडावार,संतोष चनमनवार,गोविंद अंकुरवाड, सतीश बिराजदार विवेक केंद्रे, सागर पिसारीवार, शिवा आंधळे, शिवा क्यातमवार, बब्बू तक्कलवार,आशुतोष बेद्रे, राहुल दारगुलवार, राजेंद्र भातनासे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून स्वागत आयनेनीवार व उमाकांत कराळे यांचे अभिनंदन होत आहे.

### ढाकणी येथे २४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती

**नवीन नांदेड** -महामानव विश्ववंदनीय भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ जयंती लोहा तालुक्यातील ढाकणी येथे



दि. २४ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी होणार असल्याची माहिती जयंती सोहळ्याचे स्वागताध्यक्ष विलास गजभारे यांनी दिली. या जयंती सोहळ्याचे उद्घाटन आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते होणार आहे. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांची उपस्थिती राहणार असून स्वागत अध्यक्ष म्हणून भीम कायदा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास गजभारे हे असतील. सोनखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण होणार आहे तर निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण पं.स.चे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे यांचे हस्ते होईल. महोत्सवास फुले - शाहू -आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पी.एस. गवळे, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल्ला, राष्ट्रवादीचे भारत काकडे, लोहा नपचे माजी विरोधी पक्ष नेता पंचशील कांबळे, राष्ट्रवादीचे बंटी लांडगे, दत्ता पाटील तळणीकर, प्रमुख वक्ते म्हणून सौ. सुजाता आढाव, राष्ट्रवादीचे एकनाथ वाघमारे, डॉ. उत्तम सोनकांबळे, प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि.प. सदस्य गजानन चव्हाण, मधुकर डाकोरे, सम्राट आढाव, प्रदीप हानवते ,शंकरराव धीर्डीकर, गोविंद टर्के, रत्न सर्जे, के. पी. एडके, शाहीर गौतम पवार, सुरेश गजभारे, डि.के. कांबळे, अशोक चिंतोरे, राजू लांडगे, माधव डोम्पले, अॅड. प्रसेनजीत वाघमारे, प्राध्यापक शशिकांत हटकर, आर.जे. वाघमारे, माधव आंबटवार, आकाश सोनकांबळे, अॅड. संघरत्न गायकवाड, बा.रा. वाघमारे यासह व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना नांदेड दक्षिणचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे, उपाध्यक्ष सूर्यकुमार यन्नावार ,सचिव शिवाजी राजुरकर, कार्याध्यक्ष दिगंबर शिंदे, सहसचिव सुरेश आंबटवार यांच्यासह अन्य पत्रकारांची उपस्थिती राहणार आहे.

# भाजपा तालुकाध्यक्षपदी दत्तू देशमुख तर शहराध्यक्षपदी रामसिंग चव्हाण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२१ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टीच्या निवडणुका लोकशाही पद्धतीने झाल्या असून मुदखेड भाजपा तालुकाध्यक्षपदी वाडी मुक्त्यारची येथील कार्यकुशल सरपंच प्रतिनिधी दत्तू देशमुख तर शहरअध्यक्ष म्हणून युवा नेते रामसिंग चव्हाण यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी राजाभाऊ राजेवार यांनी दि.२० एप्रिल रोजी मुदखेड येथील एका कार्यक्रमात केली.



या बैठकीचे औचित्य साधुन यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना रामसिंग चव्हाण म्हणाले की भारतीय जनता पार्टी ही कोणत्या एका जाती-धर्माची नसून सर्व जातीय धर्मांना एकत्र घेऊन काम करणारा पक्ष आहे.म्हणुन आम्ही पक्ष वाढीसाठी काम करू आणि पक्षात गट तटं न करता सर्वांना एकत्र आणून पक्ष वाढीसाठी काम करू असे बोलताना आपले मनोगत व्यक्त केले. दत्तू देशमुख वाडीकर यांना तालुकाध्यक्ष पद मिळाल्यानंतर त्यांनी आपले मत मांडले ते म्हणाले कि मि एक सर्वसामान्य कुटूंबातील कार्यकर्ता असुन पक्षानी माझ्या कार्याची दखल घेऊन मला तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे त्या जबाबदारीचे सोने करून दाखवणार असे आपले मत कार्यक्रमा प्रसंगी बोलताना मांडले.

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष अँड किशोर देशमुख, जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, संजय देशमुख लहानकर, किशोर स्वामी, विनोद चिंचाळकर,गांधी पवार आमदुरेकर संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड, गोविंदराव नागेलीकर, माधव कदम, शंकर मुतकलवाड, शामराव टेकाळे, भीमराव कल्याणे, मारुती किरकण, संजय सोनटक्के, कोमल जयस्वाल, बालाजी खटिंग, उद्धव पवार, सुनिल चव्हाण, राहुल चव्हाण, श्रीहरी बैनवाड, विनोद चंद्रे, यासह आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविक बालाजी खटिंग यांनी केले तर अभारप्रदर्शन मारोती शंखतिर्थकर यांनी मानले.



नांदेड- महापालिकेने पोलिसांच्या मदतीने देगलूर नाका परिसरातील अतिक्रमण हटविले.

# भाजपा भोकर तालुकाध्यक्षपदी दिवाकर रेड्डी तर शहराध्यक्षपदी विशाल माने

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२१ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाच्या भोकर तालुकाध्यक्ष म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड यांची तर शहराध्यक्ष म्हणून विशाल माने यांची पुनश्च एकदा निवड करण्यात आली आहे.



भाजपाच्या जुन्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्याने नूतन तालुकाध्यक्ष आणि शहराध्यक्ष निवडीची प्रक्रिया मागील काही दिवसांपासून सुरू केली होती.या दोन्ही पदासाठी अनेक मातब्बर मंडळी इच्छुक असले तरी पक्षाने वयाची अट टाकल्याने अनेकांचा पत्ता कट झाला. पक्षासाठी केलेले काम आणि सदस्य नोंदणीत घेतलेल्या पुढाकाराची दखल घेत दिवाकर रेड्डी यांच्यावर तालुकाध्यक्षाची जबाबदारी सोपवण्यात आली. तर विशाल माने यांना पुनश्च शहराध्यक्ष कायम ठेवण्यात आले. खा. अशोकराव चव्हाण, आ.श्रीजया चव्हाण यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. यास तडा जाऊ देणार नाही.गावगावात जाऊन पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे व पक्ष वाढीसाठी जोमाने काम करणार असल्याचे रेड्डी यांनी सांगीतले.

# उपनगराध्यक्ष चव्हाणांच्या मध्यस्थीने सफाई कामगारांचा संप तूर्तास मागे!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२१ एप्रिल-**

नायगांव नगरपंचायतीचे उपाध्यक्ष विजय चव्हाणा नी दिलेल्या आश्वासनांमूळे शहरातील कंत्राटी साफ सफाईच्या कामगारांचा संप तात्पुरता मागे घेतला.



जिल्ह्यातील सर्वात मोठी उत्पन्नाचे स्त्रोत असणारी नायगांव नगरपंचायत असुन.येथील शहरा अंतर्गत रस्ते स्वच्छ शहरातील नागरिकांचे आरोग्य निरोगीमय राहावे. या अनुषंगाने गेल्या काही अनेक वर्षां पासून येथील नगरपंचायती मध्ये कंत्राटदारा अंतर्गत साफसफाई २५ कामगार कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली.

परंतु येथील सफाई कामगार कर्मचाऱ्यांना दर महिन्याला तर सोडाच पण पाच पाच महिने पगार दिला जात नसल्याने या साफसफाई कामगारांच्या कुंटुंबावर सध्या उपासमारीची वेळ आली आहे.परंतु पल्लवी इंटरप्रायझेसचे आहे संचालक यत्राळे हे कामगार कर्मचार्याच्या श्रमाचा मोबदला देण्यासाठी कुठलीही हालचाल करत नसल्याने.सुपरवायझरसह पाच कर्म चार्यानी चार महिन्यांपूर्वीच या कंपनीला सोडचिठ्ठी दिल्याने शहरातील स्वच्छ तेचा पुन्श्चय प्रश्नः निर्माण झाला आहे त्यामुळे शहरात स्वच्छतेचा गंभीर बनत चालला होता. असे असतांना या विषयाकडे कुणीच लक्ष देत नसल्या मूळे.या लोकांना कामबंद आंदोलन करणे भाग पडले होते. मागील चार ते पाच महिन्यांपासून थकलेल्या पगारी बाबत कंत्राटदार काहीच बोलण्यास तयार नसल्यामुळे या वेळी सर्वच सफाई कामगारांनी दि.१७ एप्रिलपासून कामबंद आंदोलन चे हत्यार उपसल्याने शहराच्या स्वच्छतेचा प्रश्नः तूर्तास ऐरणीवर आल्यामुळे नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष विजय चव्हाण यांनी कामगार व कंत्राटदार यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी आर्थिक मदतीसाठी पुढाकार घेत काही प्रमाणात कामगारांचे वेतन देण्याची ही तरतूद केल्यामूळे.यावेळी सर्व साफसफाई कामगार कर्मचार्यांनी कामबंद आंदोलन तूर्तास मागे घेण्यात आले.

तालुक्यातील नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष विजय चव्हाण यांच्या शब्दावर विश्वास त्यांचा आदर करत हातावर पोट असलेले साफसफाई कामगार शहरा च्या स्वच्छतेसाठी सज्य होऊन कामावर परतल्या मूळे आता नायगांव शहरातील अंतर्गत रस्ते गेल्या काही दिवसांपासून अस्वच्छ तेच्या गर्तेत सापडले होते. परंतु साफसफाई कामगारांचा तिढा सुटल्याने शहरातील सर्वच व्यवसायिकांनी शहरं स्वच्छतेच्या प्रश्न सुटल्याने यावेळी समाधान व्यक्त केले

# गट विकास अधिकाऱ्यांसह ग्रामसेवकाची कार्यालयाला दांडी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२१ एप्रिल-**

हिमायतनगर तालुक्यात कर्तव्यावर असलेले ग्रामसेवक हे ग्रामपंचायतीला वेळेवर हजर राहत नसल्याने ग्राम विकासाची कामे खोळंबली आहेत. पंचायत समितीच्या कार्यालयात देखील अधिकारी व कर्मचारीही वारंवार अनुपस्थित राहत असल्याने जनतेची कामे वेळेवर होणे कठीण झाले आहे. आता गट विकास अधिकारीच कार्यालयाला दांडी मारत असल्याने त्यांचाच कित्ता इतर कर्मचारी गिरवीत आहेत.

हिमायतनगर तालुक्यात ५३ ग्रामपंचायती आहेत. ग्रामसेवकांची संख्या तशी खुप कमी असल्याने एका ग्रामसेवकाला अतिरिक्त पदभार देवून काम चालविण्यात येते. अर्थात एका ग्रामसेवकाला त्यांच्या मागणी प्रमाणे दोन अधिक ग्रामपंचायतीचा अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. ग्रामसेवक मात्र या बाबींचा फायदा उचलत आहेत. इकडच्या गावकऱ्यांना तिकडे असल्याचे सांगून वेळ मारून नेत नसल्याने अनेक महत्त्वपूर्ण कामे थांबलेली आहेत. पंचायत समिती कार्यालयात अधिकारी व कर्मचारी सातत्याने गैरहजर राहत आहेत. आपल्या सोयीनुसार नांदेड व इतरत्र वास्तव्य करून कार्यालयाला येणे जाणे असल्याने उशीरा येणे व त्यानंतर लगेच निघून जाणे असा दिनक्रम कर्मचाऱ्यांचा चालू असल्यामुळे कामांसाठी बाहेर गावाहून आलेल्या नागरिकांना रिकाम्या हातांनी परतावे लागत आहे. रेल्वेगाडीने हे कर्मचारी निघून जातात. दुपारी तीनच्यानंतर शासकीय कार्यालये ओस पडत आहेत. गट विकास अधिकारीच अप-डाऊन करीत असल्याने त्यांचा कित्ता त्यांच्या अखत्यारीत काम करणारे कर्मचारी गिरवित आहेत. या गंभीर बाबींकडे जिल्हा परिषदेच्या नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी तत्काळ लक्ष देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनमानीला चाप लावावा, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे

# 'गोपाल चरणसेवा' उपक्रमाच्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ एप्रिल-**

रखरखत्या उन्हात अनवाणी फिरणाऱ्या आबालवृद्धांना मोफत चप्पल देण्याचा गोपाल चरणसेवा या उपक्रमाच्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ सोमवारी हनुमान पेठ परिसरात करण्यात आला असून लोकसभागातून या उन्हाळ्यात २०२५ चपला वाटण्यात येणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण एड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

चार वर्षांपासून माजी प्राचार्य आत्माराम पळणीटकर यांच्या मार्गदर्शनाखाली चरणसेवाहा उपक्रम भाजपा महानगर नांदेड, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल,अमरनाथ यात्री संघ यांच्यातर्फे राबविण्यात येत आहे.जितके वर्ष असेल तितक्या चपला दरवर्षी वाटप करण्यात येतात. दिलीप ठाकूर यांच्या वडिलांचे वृद्धापकाळमुळे एक महिन्यापूर्वी निधन झाले. पळणीटकर सरांनी या उपक्रमाला येथून पुढे गोपाल चरणसेवा असे नाव देण्यात येणार असल्याची घोषणा केली .कै.गोपालसिंह ठाकूर यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर अनेकांना चप्पला वाटप करण्यात आल्या.यावर्षी



आत्माराम पळणीटकर, दिलीप ठाकूर यांनी प्रत्येकी शंभर तर हैदराबाद येथील स्नेहलता जयस्वाल यांनी पन्नास चपलाच्या जोड्या सुरुवातीला दिलेल्या आहेत.

महावीर चौक नांदेड येथिल पंचवटी हनुमान मंदिर परिसरात दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून भाऊचा माणुसकीचा फ्रिज ठेवण्यात आलेला आहे.एकही दिवस खंड न पडता दररोज सकाळी दहा वाजता किमान ४० ते ८० डब्यांचे वितरण येथे करण्यात येते. हे डबे घेण्यासाठी अपंग, भिक्षुक,निराधार, सकाळी नऊ वाजल्यापासून रांगेत थांबलेले असतात.या गरजूंना आत्माराम पळणीटकर, सौ. अंजली पळणीटकर, स्नेहलता जायस्वाल, भाजपा उपाध्यक्ष बांगड्या यादव, दिलीप ठाकूर,राजेश सिंह ठाकूर,प्रभुदास वाडेकर यांच्या हस्ते चपला देण्यात आल्या. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे, संघटन मंत्री संजय कोडगे, भाजप महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व अॅड. किशोर देशमुख, लायन्सचे उपप्रांतपाल योगेश जायस्वाल, लायंसचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी दोन महिन्यात वृद्धाश्रम, अनाथाश्रम, विट भट्टी कामगार, शेत मजूर,शासकीय रुग्णालय परिसरात चपला वाटप करण्यात येणार आहे. स्वयंसेवकांच्या वाहनात चपलाचे जोड ठेवण्यात येणार असून रस्त्यात कोणी अनवाणी फिरत असल्यास त्यांना मोफत चपला देण्यात येणार आहेत.या उपक्रमास साठी सहकार्य करणाऱ्या दानशूर नागरिकांनी दिलीप ठाकूर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलीसांनी मारहाण केल्याची तक्रार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ एप्रिल-**

कुठलीही तक्रार, आरोप नसताना पोलीसांनी मारहाण केल्याची तक्रार शेख असीफ शेख गफार यांनी एका निवेदनाद्वारे पोलीस उप महानिरीक्षकांकडे केली आहे.

शहरातील गोवर्धन घाट येथील शेख असीफ शेख गफार हा माल मजुरी करुन उदर निर्वह चालवतो. दि. १३ एप्रिल रोजी वजिराबाद बुन्हे शोध पथकाच्या कर्मचाऱ्यांनी त्यास विनाकारण मारहाण केली. बंदुकिच्या गुन्ह्यात टाकण्याची धमकी देत यातुन वाचयचे असेल तर निखिल मदने, सुरज खिराडे, कैलास भोकरे यांचे नावे धे म्हणत दमदाटी कुरुन मारहाण केली असुन विनाकारण मारहाण करणाऱ्या पोलीसांवर कारवाई करावी असे शेख असीफ शेख गफार यांनी निवेदनात नुद केले आहे.




## आयोडिन कमतरता विकारावरील लढ्यात हे मीठ मोलाची भूमिका बजावत आहे

छत्रपती संभाजीनगर- टाटा सॉल्ट १९८३ मध्ये सादर झाले. भारताच्या आयोडिन कमतरता विकारावरील लढ्यात हे मीठ मोलाची भूमिका बजावत आहे. भारतातील पहिले राष्ट्रीय स्तरावर ब्रँडेड आयोडिनयुक्त मीठ असा लौकिक असणाऱ्या 'टाटा सॉल्ट'ने गुणवत्तेचा एक नवा मापदंड निर्माण केला आणि संपूर्ण देशभरातील घरांमध्ये सहज उपलब्ध झाले. आजही, टाटा सॉल्ट हे विश्वास, गुणवत्ता आणि निरोगी जीवनशैलीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. प्रत्येक कणामधून पोषण पोहोचवण्याच्या आपल्या प्रयत्नांद्वारे, टाटा सॉल्ट भारताच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि एक सशक्त राष्ट्र घडवण्यासाठी कार्यरत आहे. आयोडिनयुक्त मीठ हा काही फक्त सरकारने निर्धारित केलेल्या आयोडिनच्या मात्रेची पूर्तता करण्यासाठी बनवलेला एखादा घटक-पदार्थ नाही, तर हे मीठ त्याहूनही अधिक मोलाचे आहे.

## ईडीआयआयने आपला ४३ वा स्थापना दिन साजरा केला

मुंबई : भारतीय उद्योजकता विकास संस्था ने २० एप्रिल २०२५ रोजी आपला ४३ वा स्थापना दिन साजरा केला. गोव्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. डॉ. प्रमोद सावंत यांनी या प्रसंगी आभासी भाषण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. पिरोज खंबाटा, अध्यक्ष - रसना ग्रुप आणि माननीय कॉन्सुल जनरल, दक्षिण कोरिया (गुजरात) यांच्यासह अनेक मान्यवर अतिथी उपस्थित होते; सन्माननीय अतिथी श्री सुनील अंचिपाका, आयएएस, सचिव (उद्योग), गोवा; श्री बी. एस. पै अँगल, व्यवस्थापकीय संचालक, ईडीसी लिमिटेड, गोवा; आयडीबीआय बँक लिमिटेड, अहमदाबाद येथील मुख्य महाव्यवस्थापक आणि झोनल प्रमुख (अहमदाबाद झोन) श्री दिनेश सिंग रावत (आणि गव्हर्निंग बोर्ड सदस्य, ईडीआयआय) आणि ईडीआयआयचे महासंचालक डॉ. सुनील शुक्ला उपस्थित होते.

## १० मिनिटांत औषधांची घरपोच डिलिव्हरी उपलब्ध

मुंबई- फोनपेचे पाठबळ लाभलेल्या पिनकोड या हायपरलोकल ई-कॉमर्स प्लिकेशन पतर्फे आता बंगळुरू, मुंबई व पुणे या शहरांमध्ये २४-तास ऑनलाइन फार्मसी सेवा सुरू केली आहे. या सेवेच्या माध्यमातून आवश्यक (जढउ आणि प्रिस्क्रिप्शन) औषधे २४ तास कधीही मिळू शकतात. ग्राहक आता कोणत्याही वेळेस औषधांची ऑर्डर देऊ शकतात आणि जवळच्या स्थानिक औषधाविक्रेत्यांकडून केवळ १० मिनिटांत औषधांची डिलिव्हरी मिळवू शकतात. ज्यांच्याकडे डॉक्टरांची चिठ्ठी (प्रिस्क्रिप्शन) नाही, अशा ग्राहकांसाठी पिनकोड पच्या माध्यमातून पात्र डॉक्टरांचा मोफत ऑनलाईन सल्ला घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. तपासणीनंतर हे डॉक्टर टेलिमेडिसिनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डिजिटल प्रिस्क्रिप्शन देऊ शकतात. त्यामुळे औषधे मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि कार्यक्षम होते.

## भाजपा जिल्हाध्यक्ष यांच्या हस्ते विजय चव्हाण यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ छत्रपती संभाजीनगर भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट त्यांच्या कार्यालयामध्ये भाजप बिडकीन मंडळ तालुका अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नवनिचित मंडळ तालुका अध्यक्ष यांचाही जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी सुनील गडदे,अजय राठोड, आदी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भाजपच्या सोयगाव तालुकाध्यक्षपदी संजय पाटील

### पक्ष निरीक्षक कल्याण गायकवाड यांनी केली घोषणा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ एप्रिल

तालुका भाजप अध्यक्ष पदासाठी रविवारी दुपारी एक वाजता सोयगावात झालेल्या विशेष बैठकीत जरंडीचे संजय गिरधर पाटील यांची एकमताने निवड झाल्याची घोषणा पक्षाचे निरीक्षक कल्याण गायकवाड यांनी केली दरम्यान संजय पाटील यांची भाजपचे तालुकाध्यक्ष पदी वर्णी लागताच त्यांचा निरीक्षक कल्याण गायकवाड यांनी सत्कार केला. दरम्यान यावेळी पक्ष वाढी साठी काम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायतीच्या निवडणुका भाजप स्वबळावर लढविण्याची संकेत त्यांनी देऊन कामाला लागा असे कार्यकर्त्यांना बैठकीत आवाहन केले.

यावेळी जेष्ठ नेते वसंत बनकर,माजी नगराध्यक्ष कैलास काळे, माजी उपनगराध्यक्ष तथा शहराध्यक्ष योगेश पाटील,सुनील गवाडे,नगरसेवक राजेंद्र जावळे,माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,मावळते तालुकाध्यक्ष बद्री राठोड आदींची उपस्थिती प्रमुख होती.यावेळी मोतीलाल वाघ,योगेश मानकर,सुनील ठोंबरे,राहुल राठोड(वरखेडी खु.)संजय मंडवे(गलवाडा),एकनाथ चौधरी(जरंडी),गजानन शिरसाट,(फर्दापूर) शेख नईम,प्रदीप चव्हाण,मयूर मनगटे,संजय आगे,राहुल पवार,भावराव पाटील,भिवा चव्हाण,आदींसह तालुक्यातील बूथ प्रमुख,शक्तिकेंद्र प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# डॉ.प्रवीण सूर्यवंशी यांना इमरल्ड पुरस्कार प्रदान

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

छत्रपती संभाजीनगर, दि. २० : महात्मा गांधी मिशन रुग्णालयाचे उपअधिष्ठाता तथा हेपेटो-पॅनक्रियो-बिलीरी सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ.प्रवीण सूर्यवंशी यांना नुकत्याच मुंबईत पार पडलेल्या 'मुंबई लाईव्ह २०२५' या जागतिक इंडोस्कोपी परिषदेमध्ये इमरल्ड पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

इंडोस्कोपी क्षेत्रात डॉ. सूर्यवंशी यांनी गेल्या २५ वर्षांपासून केलेले काम, सामान्य रुग्णांपर्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी भारतभर केलेले प्रयत्न आणि वैद्यकीय शिक्षण, संशोधन व सेवा क्षेत्रात दिलेले योगदान या सर्वांची दखल घेत ही सन्मानात्मक निवड करण्यात आली. मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये झालेल्या या दिमाखदार कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या परिषदेत २००० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे आयोजन प्रख्यात सर्जन डॉ. अमित मायदेव यांच्या नेतृत्वाखाली सर एच. एन. रिलायन्स फाऊंडेशन यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

डॉ. सूर्यवंशी यांनी २००२ साली एमजीएम रुग्णालयात इंडोस्कोपी हे अद्ययावत तंत्रज्ञान गरीब व गरजू रुग्णांसाठी उपलब्ध करून दिले. त्या काळात मराठवाड्यासारख्या भागात अत्याधुनिक वैद्यकीय सेवा दुर्लभ होत्या, त्यात त्यांनी सातत्याने नवीन तंत्रज्ञानाची भर घालत जागतिक दर्जाचे इंडोस्कोपी सेंटर रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यांनी POEM² (Per Oral Endoscopic Myotomy), EMR (Endoscopic Mucosal Resection), ESD (Endoscopic Submucosal Dissection), EUS (Endoscopic Ultrasound), आणि Cholangioscopy यांसारख्या गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या शस्त्रक्रिया मराठवाड्यात पहिल्यांदाच सुरू केल्या. गेली २२ वर्षे त्यांनी भारतभर विविध वैद्यकीय कार्यशाळा, परिषद, सीएमई आयोजित करत त्यामध्ये सहभागी होऊन इंडोस्कोपी तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला आहे.

'असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया' या देशातील सर्वात मोठ्या सर्जन्स संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी तरुण सर्जन्ससाठी विशेष फेलोशिप कोर्स डिझाइन केला असून चेन्नई येथील मुख्यालयात 'इंडोस्कोपी स्कील ट्रेनिंग सेंटर' स्थापन करण्याचे काम सुरु केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करत मुंबई लाईव्ह इंडोस्कोपी परिषदेच्या संयोजकांनी त्यांना इमरल्ड पुरस्काराने सन्मानित केले. वैद्यकीय सेवेतील सामाजिक बांधिलकी आणि तांत्रिक प्रगतीचा आदर्श म्हणून डॉ.सूर्यवंशी यांचा मार्ग सर्जन्ससाठी प्रेरणादायी ठरतो आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.प्रवीण सूर्यवंशी यांचे एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




माझ्या आजवरच्या कार्याची दखल घेऊन 'मुंबई लाईव्ह २०२५' या आंतरराष्ट्रीय इंडोस्कोपी परिषदेत इमरल्ड पुरस्काराने मला सन्मानित करण्यात आले याचा मला मनस्वी आनंद आहे. या पुरस्कारासाठी माझी निवड करणाऱ्या डॉ.अमित मायदेव सरांचे, पुरस्कार निवड समितीचे तसेच गेल्या दोन दशकांहून अधिक काळ मला सातत्याने काम करण्याची संधी आणि प्रेरणा दिल्याबद्दल एमजीएम विश्वस्त मार्गदर्शकांचे मन:पूर्वक आभार मानतो. हा सन्मान माझ्यावरची जबाबदारी वाढवणारा असून भविष्यातही अधिक नवनवीन तंत्रज्ञान गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

: डॉ.प्रवीण सूर्यवंशी

# सिल्लोड सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती उपसभापतींचे राजीनामे

## ठरल्याप्रमाणे सभापती केशवराव पाटील तायडे व उपसभापती दारासिंग चव्हाण यांनी दिला राजीनामा

सिल्लोड (प्रतिनिधी )दि .१७: कृषी उत्पन्न बाजार समिती सिल्लोड सोयगाव ची सार्वत्रिक निवडणूक जानेवारी २०२४ मध्ये पार पडली होती या निवडणुकीत माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या पॅनल ने सर्व १८ च्या १८ जागांवर दणदणीत विजय मिळवला होता यामध्ये केशवराव पाटील तायडे यांचा देखील संचालक म्हणून समावेश होता .सभापती व उपसभापती निवडणूक दि २५ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आली होती यामध्ये आमदार अब्दुल सत्तार यांच्या आदेशाने केशवराव पाटील तायडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली होती तर नव्याने विलीन झालेल्या सोयगाव तालुक्याला उपसभापती पदाचा मान दारासिंग चव्हाण यांच्या रूपाने दिला होता.त्यावेळी १ -१ वर्षाचा फॉर्मुला अब्दुल सत्तार यांच्या वतीने ठरवण्यात आला होता याच ठरावाप्रमाणे विद्यमान सभापती केशवराव पाटील तायडे व उपसभापती दारासिंग चव्हाण यांनी आज दि १७ एप्रिल रोजी सहाय्यक निबंधक कार्यालय सहकारी संस्था सिल्लोड यांना राजीनामा सुपूर्द केला आहे.

कृषी उत्पन्न बाजारसमिती सिल्लोड सोयगाव च्या सभापती व उपसभापती पद रिक्त होणार असल्याने यापदांवर अब्दुल सत्तार कोणाला संधी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# ३१ फुटी पाषाणाचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते पूजन

छत्रपति संभाजी नगर चांदवड जवळ पूज्य राष्ट्रसंत आचार्य श्री देवनन्दिजी गुरुदेव यांच्या संकल्पनेतून भव्य णमोकार तीर्थ आकार घेत आहे.दि ६ ते १३ फेब्रुवारी २०२६ रोजी णमोकार तीर्थावर भव्य आंतराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा व महामस्तकाभिषेक महोत्सव होणार आहे. त्यानिमित्त जोरदार तयारी सुरु आहे.

तीर्थावर भगवान आदिनाथ भगवान भरत व भगवान बाहुबली यांच्यां भव्य ३१ फूट उंच प्रतिमा उभी केल्या जाणार आहे. त्यापैकी भगवान आदिनाथ यांची भव्य प्रतिमा उभी झालेली आहे. भगवान बाहुबली व भगवान भरत यांच्या प्रतिमेसाठी १०९ टन वजन असलेल्या ३१ फुट उंच २ शिला बैंगलुरु येथील खाणीतुन ट्रकने येत आहे. हा पाषाण बैंगलुरु येथुन १ एप्रिलला प्रवास करीत दि. १६ एप्रिल रोजी महाराष्ट्राच्या भूमीत सोलापुर येथे यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

तेथुन उस्मानाबाद, बीड, छत्रपती संभाजीनगर ३१ फ़ीट प्रतिमा पाषाण चे छत्रपति संभाजी



नगर एस क्लब आगमन झाले यावेळी समाज बांधव वतीने भव्य स्वागत व पूजन केले

सर्व प्रथम न्यायमूर्ती श्री कैलासचंदजी चाँदीवाल व पालकमंत्री संजय शिरसाट प्रतिमापाषाण वर स्वस्तिक काढुन पुष्प माला अर्पण केली या वेळी पालकमंत्री , श्री पंचायत अध्यक्ष महावीर जी पाटनी, श्री विकास जैन, श्री नंदू घोड़ेले श्री ललीत जी पाटनी श्री रविजी पहाड़े, श्री मनोजजी लोहाड़े सुर्यकुमार पहाडे यांन श्रीफल अर्पण केले सौ ज्योत्स्ना पहाड़े अर्घ चढ़ वुन पूजन केले

यावेळी . श्री विपिन कासलीवाल महेंद्र ठोले ऊपायक्ष महावीर गंगवाल मनोज सावजी मनोज दगड़ा जितेंद्र पाटनी देवेन्द्र काला सचिव प्रकाश अजमेरा प्रकाश कासलीवाल वैभव काला हेमंत गंगवाल शितल गंगवाल मनोज चांदिवाल प्रकाश ठोले सुनील कासलीवाल आरआर पहाड़े डॉ रमेश बड़जाते मुन्ना चांदिवाल डॉ जितेंद्र पहाड़े विनोद लोहाडे अमित कासलीवाल मयुर काला आंनद सेठी बापू कासलीवाल अरुण पाटणी यांचा सह हजारों भक्त उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली जिल्ह्यात ही ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले ,

या पाषाणाचे विशेष म्हणजे हे पाषाण काही दिवसात णमोकार तीर्थ येथे भरत व बाहुबली चे रूप घेणार आहे. भगवान आदिनाथांचे पुत्र भरत हे चक्रवर्ती होते, सहा खंडाचे राजा होता. त्यांच्या नावावरुनच आपल्या देशाला 'भारत नाव पडले आहे. तसेच भगवान बाहुबली हे वीर पराक्रमी होते. त्यांची श्रवणबेलगोला येथे जगप्रसिध्द ५२ फुट प्रतिमा आहे. त्यानंतर ही दोघांची सर्वात मोठी प्रतिमा ठरणार आहे. अशी माहिती णमोकार तीर्थाचे अध्यक्ष निलम अजमेरा यांनी दिली. फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या जागतिक महोत्सवामध्ये लाखोंच्या संख्येने भाविक येणार आहे. नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळा अगोदर जैन समाजाचा हा महाकुंभ होणार आहे. . ही प्रतिमा दोन सख्या भावांची आहे. हे एकतेचे प्रतिक आहेअशी माहीती नरेंद्र अजमेरा पियुश कासलीवाल यानी दीली

# 'आनंदी वृद्धत्व' चे थाटात प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी - वृद्धत्व म्हणजे संधी मनाच्या शांततेची, अनुभवांच्या गाठी उघडण्याची आणि आयुष्याकडे नव्या दृष्टीने पाहण्याची. याच जीवनमूल्यांना उजाळा देणारे, ज्येष्ठ नागरिकांसाठी लिहिले गेलेले 'आनंदी वृद्धत्व' या प्रेरणादायी पुस्तकाचे नुकतेच एका भावस्पर्शी समारंभात प्रकाशन झाले. बीड येथे महिला महाविद्यालयात गृहविज्ञान विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत असणार्या डॉ. वर्षा कुलकर्णी-होळकर यांनी आपल्या अनुभवातून आणि साक्षेपी निरीक्षणातून वृद्धत्वाची वेगळीच बाजू या पुस्तकातून मांडली आहे. एक अशी अवस्था जिथे शांती, समाधान आणि समाजासाठी देणं हे केंद्रस्थानी आहे.

वृद्धांचा आहार व पोषण, वृद्धाश्रमांची गरज, वृद्धांसाठींच्या योजना, नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना अश्या अनेक विषयांवर भाष्य केले आहे. या प्रकाशनप्रसंगी उपस्थित असलेले ज्येष्ठ पाहुणे आणि वाचक भावविवश होवून गेले.

# तरुणांनो आई वडीलांच्या कष्टाकडे दुर्लक्ष करु नका - महंत रामगिरी महाराज

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ सध्याच्या माहिती आणि तंत्रज्ञान , धावपळ व पैसा कमविण्याच्या नादात तरुणवर्ग आई वडिलांकडे दुर्लक्ष करतांना दिसुन येतो.ज्या मातापित्यांनी तुम्हाला काबाड कष्ट करून वाढविणे तुम्हाला घडविले त्यांच्या कष्टाकडे दुर्लक्ष करु नका असे प्रतिपादन सरलाबेट मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी श्रीराम ज्ञानदा वारकरी आश्रमात वै.गंगुबाई चनघटे यांच्या वर्षश्राद्ध निमित्ताने केले जिवनात पैशाला अनन्यसाधारण महत्त्व आसले तरी जननी जन्मभूमीस्य स्वर्गादपी गरीयसी या शास्त्रोक्तीप्रमाणे मातेचे महत्त्व फार मोठे असुन माहिती आणि तंत्रज्ञान जोरावर मनुष्य प्रगती करत आसला तरी आनेक कुटुंब विभक्त होत आहे यामुळे अशा सामाजिक



सलोखा बिघडत चालला आहे. तरुणवर्ग आई-वडिलांनी केलेल्या कष्टाकडे दुर्लक्ष करून भौतिक जगतामध्ये रंगून चालले आहे ज्यांनी आपल्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केले अशा आई-वडिलांच्या प्रति प्रामाणिक राहावे, त्यांचा सांभाळ करून त्यांची काळजी घ्यावी त्यांची सेवा करावी असे आवाहन करत अनेक संत प्रमाण व दाखले देत समाज प्रबोधन केले.यावेळी अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले , महंत भक्तीदास महाराज , रमेश महाराज गोरे आळंदीकर , ज्ञानेश्वर महाराज जाधव आळंदीकर , हरिदास महाराज आळंदीकर , गुरुवर्य रखमाजी महाराज नवले गुरुवर्य कृष्णाजी महाराज नवले , महंत कैलास गिरी महाराज , श्रीराम ज्ञानदा आश्रमाचे संस्थापक तथा श्री नाथ मंदिर पैठणचे विश्वस्त विठ्ठल शास्त्री चनघटे यांच्यासह हजारो वारकरी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१७)

भारतीय मजदूर संघ

भा.म.संघ हे भारताचे सर्वात मोठे केंद्रीय श्रमिक संघटन आहे. याची स्थापना भोपाळमध्ये महान विचारक श्री दत्तोपंत ठेंगडी द्वारा लोकमान्य टिळकांच्या जन्मदिवशी २३ जुलै १९५५ ला झाली.

ही मजुरांची मजदूरांकरता मजदूरद्वारा संचलित स्वतंत्र संघटना आहे. इथे मजुरांनी श्रम कर्तव्य आणि श्रमशिस्त महत्त्वपूर्ण मानली आहे. अर्थातच सर्व समावेशक राष्ट्रकारण इथे महत्त्वाचे ठरते.

म्हणजे राष्ट्राचे औद्योगीकरण, उद्योगाचे श्रमिकीकरण, श्रमांचे राष्ट्रीयीकरण या त्रिसूत्री वर ही संघटना काम करते.

१७ सप्टेंबरला विश्वकर्मा जयंतीला राष्ट्रीय श्रम दिवस म्हणून साजरा करतात. आज काँग्रेस, कम्युनिस्ट आणि इतर पक्षांच्या पूर्ण प्रभावाखाली अनेक कामगार संघटना आहेत. परंतु भा.म. संघाने या संघटनांना मोडीत काढले आहे. आज हे संघटन शून्यातून शिखर पर्यंत पोहोचले आहे. भारत माता की जय हा उद्घोष फक्त उद् घोष भा.म. संघातच होतो. ही संघटना स्वतंत्र नारा देत असते. मजदूरो दुनिया को एक करो, बाकी अन्य कामगार संघटना चा नारा आहे दुनिया के मजदूर एक हो भा. म. संघाचा दुसरा नारा आहे देश के हित मे करेंगे काम, काम के लेंगे पुरे दाम बाकी अन्य संघटनांचा नारा असतो चाहे जो मजबूरी हो, मांग हमारी पुरी करो भा.म. संघाचे अजून काही नारे वाचा. नया जमाना आयेगा कमाने वाला खिलायेगा (२) बी. एम. एस. की क्या पहचान। त्याग-तपस्या और बलिदान ।। थोडक्यात भा.म. संघ राजकारण नाही तर *राष्ट्रकारणाचा पुरस्कार करतो १९६२ च्या भारत चीन युद्धकाळात श्रमिक दृष्टिकोन खूप महत्त्वाचा होता. यावेळी भा.म.संघाने आपली चालू असलेली आंदोलने स्थगित केली होती. व रक्षा उत्पादन, परिवहन, विद्युत उत्पादन , तसेच सामाजिक महत्त्वाच्या क्षेत्रात संपूर्ण सहाय्य केले होते. आणि त्यातूनच भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ उदयाला आला ही देशभक्ती सर्वांना अचंबित करणारी होती असो.

।। भारत माता की जय ।।

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या नव्या शोरूमचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर, २१ एप्रिल २०२५ : विश्वासार्ह आणि उत्तरदायी सराफ पेढी असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगरमध्ये त्यांचे नूतनीकृत शोरूम पुन्हा सुरू केले आहे. जालना रोडवरील मोंढा नाका येथे असलेल्या या नूतनीकरण केलेल्या दालनाचे उद्घाटन छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी श्री दिलीप स्वामी यांनी कंपनीच्या व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांसह, मौल्यवान ग्राहक आणि हितचिंतकांच्या उपस्थितीत केले.

सुमारे ५,७०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे दालन ग्राहकांना विविध डिझाइन आणि शैलींमध्ये दागिन्यांच्या उत्कृष्ट संग्रहणासह जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. या दालनाच्या पुन:अनावरणामुळे पश्चिम भारतात मलाबार ब्रँडची उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे आणि त्याचबरोबर अपवादात्मक कारागिरी आणि ग्राहक सेवेची व्याप्ती देखील वाढली आहे.

अक्षय्य तृतीयेच्या उत्सवाचा भाग म्हणून, या दालनांत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्क्यांपर्यंत सूट, मौल्यवान दगड आणि न कापलेल्या हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्क्यांपर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या किमतीवर २५ टक्क्यांपर्यंत सूट देऊ करण्यात आली आहे.






## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 328/2025 Next Date 18/06/2025

अर्जदार : १) अमोल आसाराम बोरुडे, २) भारत आसाराम बोरुडे, ३) जयाबाई भ्र.आसाराम बोरुडे, ४) मंदाबाई भ्र. ज्ञानेश्वर बोरकर, सर्व रा. सावखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस. कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.व्ही.जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वर्सि प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. ३ यांचे पती आणि अर्जदार नं. १, २ आणि ४ यांचे पिता नामे आसाराम शंकर बोरुडे यांचा दि.१४/०२/२०२३ रोजी मौजे सावखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत आसाराम शंकर बोरुडे यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत आसाराम शंकर बोरुडे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे. वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी ओज दिनांक १९/०४/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर